Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०४/२०११** **दिनांक २१.०५.२०११**

**स्थळ - शिर्डी कार्यालय** **वेळ- दुपारी २.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शनिवार दिनांक २१.०५.२०११ रोजी दुपारी २०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात (साईनिवास अतिथीगृहात) आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं. एसएसएस-वशी-०४-९३९-२०११, दिनांक १६ मे,२०११ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते.

सदरहू सभा काही अपरिहार्य कारणास्तव शनिवार दिनांक २१.०५.२०११ रोजी दुपारी २.०० ऐवजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात (साईनिवास अतिथीगृहात) आयोजित करणेत आली असलेबाबत समितीच्या सदस्यांना दुरध्वनीव्दारे कळविण्यात आले होते.

त्यानुसार सदरहू सभा शनिवार दिनांक २१.०५.२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहात मा.अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री जयंत मुरलीधर ससाणे,अध्यक्ष
०२. मा.श्री पांडुरंग गमाजी अभंग
०३. मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे
०४. मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर
०५. मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर
०६. मा.श्री कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्ड्ये
०७. मा.सौ.अलका बाळू शेजवळ

मा.किशोर रा.मोरे
कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती नसल्याने अर्धा तास मा.सदस्यांची वाट पाहून नंतर सकाळी ११.३० वाजता सभेचे कामकाज मा.अध्यक्ष, श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत सर्वश्री मा.श्री शंकरराव गेणूजी कोल्हे,उपाध्यक्ष, मा.ना.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील,मा.श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव, मा.श्री शैलेश श्रीहरी कुटे, मा.श्री समि खतिब, मा.श्रीमती रिम्पल लोहिया, मा.रमाकांत गणेश कर्णिक, मा.कॅप्टन सुरेश वासूदेवा व मा.डॉ.प्यारेलाल तिवारी यांनी दूरध्वनीवरुन कळविले आहे. त्याची नोंद घेण्यात येऊन, समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करण्यात आली.

**विषय नं.०१ दिनांक २६.०३.२०११ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र. २८२** दिनांक २६.०३.२०११ रोजी शिर्डी (साईनिवास अतिथीगृह) येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या-

**(०१) निर्णय क्र. - २२२**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या प्रलंबित असलेल्या बीलांचा परतावा करण्यात यावा. मात्र यापुढे येणारे जादा वैद्यकीय बीलांच्या परताव्याबाबत वैद्यकीय अधिकारी,संस्थान अधिकारी व कर्मचारी यांनी एकत्रित बैठक घेऊन, शासकीय कर्मचाऱ्यांना वैद्यकीय बीलांचा परतावा करणेबाबत काय पद्धती आहे याबाबत चौकशी करुन सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी सादर करावा,असें ठरलें.**

याऐवजी खालीलप्रमाणे वाचणेत यावे.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या प्रलंबित असलेल्या बीलांचा परतावा करण्यात यावा. मात्र यापुढे येणारे जादा वैद्यकीय बीलांच्या परताव्याबाबत वैद्यकीय अधिकारी व संस्थान अधिकारी यांनी एकत्रित बैठक घेऊन, शासकीय कर्मचाऱ्यांना वैद्यकीय बीलांचा परतावा करणेबाबत काय पद्धती आहे याबाबत चौकशी करुन सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी सादर करावा,असें ठरलें.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**(०२) निर्णय क्र.२८१ (०५)**

**समाधी मंदिराचे उत्तर बाजूस शेड उभारणेबाबत सविस्तर प्रस्ताव तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे सभेपूढे मान्यतेसाठी सादर करावे.**

याऐवजी खालीलप्रमाणे वाचणेत यावे.

**समाधी मंदिराचे उत्तर बाजूस शेड उभारणीचे काम बँकामार्फत देणगी स्वरुपात करुन घेण्यास व त्यांचे योग्य आकारचे नावाची प्लेट शेडवर बसविणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

यानंतर सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.०२** दिनांक ०६.०३.२०११ रोजी शिर्डी येथे झालेल्या वैद्यकीय उपसमिती सभेचे इतिवृत्त.
**निर्णय क्र. २८३** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

---

**विषय नं.०३** दिनांक २९.०३.२०११ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त.
**निर्णय क्र. २८४** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

---

**विषय नं.०४** दिनांक ०८.०४.२०११ रोजी शिर्डी येथे झालेल्या सल्लागार परिषद सभेचे इतिवृत्त.
**निर्णय क्र. २८५** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

---

**विषय नं.०५** दिनांक १०.०४.२०११ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त.
**निर्णय क्र. २८६** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

---

**विषय नं.०६** दिनांक २२.०४.२०११ रोजी शिर्डी येथे झालेल्या वैद्यकीय उपसमिती सभेचे इतिवृत्त.
**निर्णय क्र. २८७** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

---

**विषय नं.०७** (अ) नोंद घेण्याचे विषय.

०१ (अ) माहे मार्च-एप्रिल-२०११ मध्ये दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.
(ब) माहे मार्च- एप्रिल-२०११ मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.

**निर्णय क्र. २८८ (A)** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

---

०२. श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये फेब्रुवारी -२०११ या महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेल्या सवलतीची नोंद घेणे.

**निर्णय क्र. २८८ (B)** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

---

०३. माहे जानेवारी -२०११ मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये अपोलो फार्मसी यांना चालविण्यास दिलेल्या मेडीकल स्टोअरचे लेखा अहवालाची नोंद घेणे बाबत.

**निर्णय क्र. २८८ (C)** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

---

०४. श्री साईनाथ रुग्णालयात माहे मार्च-एप्रिल-२०११ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान मागणी अर्जाबाबत.

**निर्णय क्र. २८८ (D)** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

---

०५. श्री साईनाथ रुग्णालयात माहे फेब्रुवारी -मार्च -२०११ मध्ये गरीब रुग्णांना बीलात दिलेल्या सवलतीची नोंद घेणे.

**निर्णय क्र. २८८ (E)** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

---

०६. माहे मार्च ,२०११ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेऊन मान्यता देणे.

**निर्णय क्र. २८८ (F)** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

---

०७. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेऊन मान्यता देणे.

**निर्णय क्र. २८८ (G)** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

---

०८. पाणी तपासणी अहवाल.

**निर्णय क्र. २८८** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

---

**विषय नं.०८** **साईनाथ रुग्णालयाचे पश्चिमेकडील कंम्पाऊंड भिंतीची उंची वाढविणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**प्रस्ताव-** संरक्षण विभागाने त्यांचे दि.२६/०३/२०११ रोजीचे टिपणी अन्वये श्री साईनाथ रुग्णालयाचे पश्चिमेकडील कंपाउंड भिंतीची उंची वाढविणेस कळविले आहे. पश्चिम व उत्तर बाजुच्या कंपाउंड भिंतीची उंची दोन फुटाने वाढवून त्यावर तिन फुटाची चेनलींक फेन्सींग करणेस तसेच दक्षिण बाजुकडील सध्या ब्लॉक मध्ये केलेली कंपाउंड भिंत काढून त्याठिकाणी ७' उंचीची भिंत बांधून त्यावर ३' उंचीची चेनलींक फेन्सींग लावणेस व याकरीता येणारे अंदाजे रु.३.२५ लक्ष मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



दि.०२/११/२०१० रोजीचे सभेतील नि.क्र.८७३ अन्वये ठेकेदार संजय गणपत गायकवाड, राहाता यांचे भक्तनिवासस्थान इमारतीचे पश्चिमेकडील कंपाउंड भिंत बांधकाम करणेचे मागील मंजूर दरात काम करुन घेणेस मान्यता मिळाली होती. त्यानुसार ठेकेदार यांना कार्यादेश देणेत आला होता. परंतू सदर ठेकेदार यांनी काम करण्यास असमर्थता दर्शविल्याने त्यांचेकडून सदरचे काम काढून घेणेत आले आहे.

सदर कंपाउंड भिंतींचे बांधकाम करणेकरीता इकडील विभागाचे जा.क्र. ३२५ दि.१४/०४/२०११ रोजीचे कोटेशन मागणी पत्रान्वये रु.३,२४,९५२/- मात्र इतक्या अंदाजपत्रकीय रकमेच्या कामासाठी नव्याने कोटेशन मागविणेत आले होते. त्यानुसार खालील दोन ठेकेदारांनी दि.२३/०४/२०११ पर्यंतचे अंतिम मूदतीत तर एका ठेकेदाराने मूदतीनंतर सिलंबद कोटेशन्स जमा केले आहेत.

| अ.नं. | ठेकेदारांचे नांव | आवक क्र. | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. पी.बी. जाधव, संगमनेर | १५८१ | २३/०४/२०११ |
| ०२ | श्री.एस.एन. गुंजेगांवकर, निघोज | १५८५ | २३/०४/२०११ |
| ०३ | इंजि. योगेश सुरेश पाटील, कोपरगांव | २३३८ | ०६/०५/२०११(उशिरा प्राप्त ) |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त कोटेशन्स आजचे सभेपुढे समक्ष उघडणेत येऊन कोटेशनसादरकर्त्यांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | ठेकेदारांचे नांव | कोटेशनमधील दर | चर्चेअंती देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. पी.बी. जाधव, संगमनेर | २०% अधिक | १५ % अधिक |
| ०२ | श्री.एस.एन. गुंजेगांवकर, निघोज | ४५ % अधिक | ४० % अधिक |
| ०३ | इंजि. योगेश सुरेश पाटील, कोपरगांव | ४८ % अधिक | ४८ % अधिक |

**निर्णय क्र. २८९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. श्री. पी.बी. जाधव, संगमनेर यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं ०९** **मौजे राहाता येथील गट नं. ३४१ व ३४८ मध्ये उभारण्यात आलेल्या संयुक्त घनकचरा खत प्रकल्पाकरीता बनविण्यात आलेल्या फॅक्टरी शेडलगतचे उर्वरित जागेत काँक्रीट करणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.१३/०२/२०११ रोजीचे सभेतील नि.क्र.९३ अन्वये मौजे राहाता येथील गट नं. ३४१ व ३४८ मधे उभारण्यात आलेल्या संयुक्त घनकचरा खत प्रकल्पाकरीता बनविण्यात आलेल्या फॅक्टरी शेड लगतचे उर्वरीत जागेत २३० mm सोलींग करुन त्यावर १०० एम एम जाड १:३:६ मालात P:C:C करणे व त्यावर १५० mm जाड १:१.५:३ मालात काँक्रीट करणेसाठी येणारे रक्कम रु.१३,३३,२००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाली आहे. तसेच याकामी विहीत पध्दतीने निविदा मागविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. याकरीता विभागामार्फत निविदा तयार करणेत आल्या होत्या व दि. ०८/०४/२०११ रोजीच्या दैनिक पुढारी व लोकमत या वृत्तपत्रात निविदा सुचना प्रसिद्ध करणेत आली होती. को-या निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आलेल्या दि. ०९/०५/२०११ पर्यंतच्या अंतिम मुदतीत ६ ठेकेदारांनी को-या निविदा खरेदी केल्या व त्यापैकी खालील पाच ठेकेदारांनी विहीत मुदतीत सिलबंद निविदा सादर केल्या आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नाव |
|---|---|
| ०१ | श्री राजेंद्र एस. घेगडे, नाशिक |
| ०२ | श्री मिलींद एस. पाचोरकर, नाशिक |
| ०३ | इजि.बोरा श्रेणीक प्रफुल्ल, कोपरगाव |
| ०४ | श्री गुंजेगावकर संतोष एन, निघोज |
| ०५ | मे.एन.एस.बनकर पाटिल ॲण्ड कंपनी, श्रीरामपुर |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | ठेकेदाराचे नाव | निविदेतील दर | चर्चेअंती देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१ | श्री राजेंद्र एस. घेगडे, नाशिक | निविदादरात | निविदादरात |
| ०२ | श्री मिलींद एस. पाचोरकर, नाशिक | अपात्र | अपात्र |
| ०३ | इजि.बोरा श्रेणीक प्रफुल्ल, कोपरगाव | ४५% अधिक | ४५% अधिक |
| ०४ | श्री गुंजेगावकर संतोष एन, निघोज | ३२.५० % अधिक | २५ अधिक |
| ०५ | मे.एन.एस.बनकर पाटिल ॲण्ड कं. श्रीरामपुर | ७% अधिक | निविदादरात |

**निर्णय क्र. २९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.एन.एस.बनकर पाटील ॲण्ड कंपनी, श्रीरामपुर यांनी यापूर्वी संस्थानचे पांढूर्ली येथील पालखी थांबा, जिल्हा परिषद शाळा, शिर्डी येथील यू.जी. वॉटर टँक ही बांधकामे समाधानकारकरित्या पूर्ण केलेली असल्याने व अशाप्रकारे त्यांचेबाबत पूर्वानुभव असल्याचे त्यांचे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.१०** **संस्थान परिसरातील अंतर्गत रस्ते पार्कींगचे श्री साईप्रसादालयाकडे जाणाऱ्या निमगांव शिव रस्त्याचे डांबरीकरण करणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**प्रस्ताव-** संस्थानचे श्री साईबाबा भक्तनिवास, साईप्रसाद निवासस्थान व साईनगर या परिसरातील श्री साई प्रसादालय येथे जाणारे वाहनासाठी संस्थान मालकीचे नजीकचे गट नं. ८७,८८ मध्ये वाहनतळाचे खडीकरण करणेत आलेले आहे. नगर-मनमाड रस्ता ते श्री साई प्रसादालयाकडे जाणाऱ्या निमगांव शिव रस्त्याचे प्रसादालयापर्यंत डांबरीकरण यापुर्वी करणेत आलेले आहे. गट नं. ८७,८८ मधील वाहनतळ व सैनिक आरामगृहाकडे जाणारे रस्त्याचे फक्त मजबुतीकरणासह खडीकरण करणेत आलेले आहे. सदर रस्त्याचे डांबरीकरण करणे आवश्यक आहे. वरिलप्रमाणे संस्थानचे विविध ठिकाणच्या पार्किंगचे व अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणेकामी येणारे सर्व समावेशक रु.९९,५८,२२५/- मात्रचे खर्चास तसेच याकामी युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि.,पुणे यांचेकडून सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन निविदा मागविणेस मा. व्यवस्थापन समितीचे दि.१८/०४/२०१० रोजीचे सभेत नि.क्र.३७५ अन्वये मान्यता देणेत आली आहे. त्यानुसार सदर कामासाठी सल्लागार युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि., पुणे यांनी रक्कम रु.१,०२,०८,२८२/- मात्र खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन निविदा तयार केल्या आहेत.

याकामी वर्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिद्ध करुन कोऱ्या निविदा फॉर्मची विक्री दि. २८/०४/२०११ ते ०९/०५/२०११ अखेर तसेच सिलबंद निविदा सादर करणेची मुदत दि. १२/०५/२००११ अखेर ठेवणेत आली होती.

**अ)** विहीत मुदतीत खालील ठेकेदार यांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतले आहेत.

१. मे. जगताप कन्स्ट्रक्शन ॲण्ड इंजिनिअरिंग कं. मु.पो. कोल्हार खुर्द, ता.राहुरी
२. पॅसो इंजिनिअर्स ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर्स, कोपरगाव
३. मे. बनकर पाटील & इंजिनिअर्स, अंगणगाव ता. येवला जि. नाशिक
४. रोमन टरमॅट लि. गोरेगांव (पुर्व ) मुंबई.
५. मे. एस. के. येवले ॲण्ड कं. संगमनेर
६. मे. एन. के. गाडे, संगमनेर
७. मे. बी.डी. शिंदे ॲन्ड कंपनी. राहाता
८. श्री. महेश एस. जाजु, संगमनेर

**ब)** विहित मुदतीत खालील निविदाधारकांनी सिलबंद निविदा सादर केलेल्या आहेत-

| अ.नं. | ठेकेदाराचे नाव व पत्ता |
|---|---|
| ०१ | मे. जगताप कन्स्ट्रक्शन ॲण्ड इंजिनिअरिंग कं. मु.पो. कोल्हार खुर्द, ता. राहुरी |
| ०२ | पॅसो इंजिनिअर्स ॲन्ड कॉन्ट्रॅक्टरर्स, कोपरगांव |
| ०३ | श्री. महेश एस. जाजु, संगमनेर |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | ठेकेदाराचे नाव | निविदेतील दर | चर्चेअंती देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१ | मे. जगताप कन्स्ट्रक्शन ॲण्ड इंजिनिअरिंग कं. मु.पो. कोल्हार खुर्द, ता. राहुरी | ५.५१% कमी | ७% कमी |
| ०२ | पॅसो इंजिनिअर्स ॲन्ड कॉन्ट्रॅक्टरर्स, कोपरगांव | ४% अधिक | ६% कमी |
| ०३ | श्री. महेश एस. जाजु, संगमनेर | २५% अधिक | ११% अधिक |

**निर्णय क्र. २९१ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. जगताप कन्स्ट्रक्शन ॲण्ड इंजिनिअरिंग कं. मु.पो. कोल्हार खुर्द, ता. राहुरी यांचे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं. ११** **श्री साईबाबा हॉस्पिटल समोरील भागात रुग्णांचे नातेवाईकांना थांबण्यासाठी शेड करणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये गोरगरीब पेंशट मोठ्या प्रमाणावर वैद्यकीय तपासणीसाठी येत असतात. तसेच ॲडमीट असलेल्या पेशंट समवेत त्यांचे कमीत कमी दोन ते तीन नातेवाईक असतात. मा. उपाध्यक्ष श्री. कोल्हे सो. यांनी सदर परिस्थितीची दि. १६/०४/२०११ रोजी समक्ष पहाणी करुन रुग्णांच्या नातेवाईक यांना थांबण्यासाठी साईबाबा हॉस्पिटल समोरील मोकळ्या जागेत शेड व टॉयलेट उभारणेकामी प्रस्ताव सादर करणेबाबत सूचना दिलेल्या होत्या.

त्यानुसार दि. २२/०४/२०११ रोजी श्री साईबाबा हॉस्पिटल येथे झालेल्या मा. उपाध्यक्ष, मा. विश्वस्त डॉ. तिवारी, डॉ. गोंदकर, श्री. वाबळे, श्री. खांबेकर व सौ. अलकाताई शेज्वळ यांचे बैठकीत रुग्णांचे नातेवाईकाना थांबणेसाठी Awning fabric मधे शेड करणेस तसेच शेडमधे बैठक व्यवस्था करणेस व याकामी निविदा मागविणेस मान्यता मिळाली आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



सदरची कामे करणेसाठी ॲव्हनिंग फॅब्रीक मध्ये शेड तयार करणेस स्ट्रक्चरल कामासह अंदाजे रक्कम रु. ८,३३,५१२/- मात्र खर्च येईल. सदरहु खर्च रु. ५ लक्ष मात्र पेक्षा जास्त असल्याने याकामी वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविणे आवश्यक होते. परंतु सदरचे काम हे तातडीचे असल्याने त्यासाठी अशा प्रकारचे काम करणाऱ्या नऊ ठेकेदारांकडुन जा. क्र. एसएसएसटी/बांधकाम/८०६/२०११, दि. ०७/०५/२०११ अन्वये कोटेशन मागविण्यात आले होते. त्यापैकी खालील तिन ठेकेदारांनी कोटेशन सादर करण्याच्या दि. १२/०५/२०११ पर्यंतच्या अंतिम मुदतीत कोटेशन सादर केले आहे व एक ठेकेदार यांनी मुदतीनंतर कोटेशन सादर केले आहे.

| अ.नं. | ठेकेदाराचे नाव |
|---|---|
| ०१ | रविंद्र रबर प्रोडक्ट्स & फॅब्रीकेशन, श्रीरामपुर |
| ०२ | पुजा स्टिल कार्पोरेशन, मुंबई |
| ०३ | सिटाडेल आर्किटेक्चरल सोल्युशन्स प्रा.ली. मुंबई |
| ०४ | दुर्गा ट्रेडींग कार्पोरेशन, औरंगाबाद |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | ठेकेदाराचे नाव | निविदेतील दर प्रति स्केअर फूट रुपये | चर्चेअंती देऊ केलेले दर प्रति स्केअर फूट रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | रविंद्र रबर प्रोडक्ट्स & फॅब्रीकेशन, श्रीरामपुर | ३५०/- | ३२५/- |
| ०२ | पुजा स्टिल कार्पोरेशन, मुंबई | ३२५/- | ३००/- |
| ०३ | सिटाडेल आर्किटेक्चरल सोल्युशन्स प्रा.ली. मुंबई | ९००/- | ९००/- |
| ०४ | दुर्गा ट्रेडींग कॉर्पोरेशन, औरंगाबाद | १४५/- | १४५/- |

**निर्णय क्र. २९२ यावर सविस्तर चर्चा होऊन, दुर्गा ट्रेडींग कॉर्पोरेशन, औरंगाबाद यांचे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.**

**तसेच याकामी आवश्यक असलेले फौंडेशन, सोलींग, पी.सी.सी वीट बांधकाम, फ्लोरिंग इत्यादी कामे संस्थानतर्फे करावयाची असल्याने त्यासाठी खात्यामार्फत मटेरिअल खरेदी करुन मजूरी ठेकेदारांमार्फत विहीत पध्दतीने काम करुन घेणेस व त्यासाठी येणारे योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१२ श्री साईनाथ रुग्णालयाचे गादी पिलो खरेदीचे कोटेशन उघडून निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयाने दैनंदिन वापरासाठी लागणा-या विविध प्रकारच्या लिननची व गादयांची दिनांक ०४/०५/२०१० रोजीचे मागणीपत्राअन्वये मागणी केलेली आहे. सदर लिनन खरेदीस साधारणतः रु.२५,४३,८००/- खर्च अपेक्षीत होता.

मा.व्यवस्थापन समिती सभा दिनांक ०७/०८/२०१० चे सभेत निर्णय क्रमांक ६२७ अन्वये सदर खरेदी कामी येणा-या अंदाजे रु.२५,४३,८००/-चे खर्चास व सदरचे खरेदीकामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागविण्यास मान्यता मिळाली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीसाठी महाराष्ट्र टाइम्स- मुंबई, दैनिक सामना-मुंबई, व इंडियन एक्सप्रेस-पुणे, या वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती,तसेच संस्थानचे संकेत स्थळावर देखील निविदा टाकण्यात आली होती.

निविदा विक्रीची दिनांक १३/०९/२०१० ते २५/०९/२०१० पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२८/०९/२०१० सायंकाळी ५ वाजेपर्यंत ठेवण्यात आली होती. सदरच्या निविदा हया मुंबई कार्यालय व शिर्डी कार्यालयात विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या. तसेच एकुण १३ उत्पादक कंपन्या/पुरवठा धारक यांना इकडील पत्र क्र.२८६१ दि.३०/०८/२०१० अन्वये जाहीराती बाबत अवगत करणेकामी पत्र पाठविण्यात आले होते. सदर जाहीरातीस अनुसरुन तिन निविदाधारकांच्या सिलबंद निविदा १. मे.केसी.एम इंटरनॅशनल, जयपुर २. मे. मोता गारमेंट,बारामती ३-मे. बांठीया एन्टरप्रायजेस,पुणे या तीन सिलबंद निविदा हया मा. व्यवस्थापन समिती सभा दिनांक ०५/१२/२०१० चे सभेतउघडण्यात आल्या होत्या.

त्यामध्ये श्री साईबाबा रुग्णालयासाठी दिनांक १०/१०/२०१० चे सभेतील निर्णयानुसार लिनन खरेदी करण्यात आले होते, त्याच मंजुर दराने श्री साईनाथ रुग्णालयाचे समान मागणी असलेले लिनन खरेदी करणेबाबत निर्णय झालेला होता त्यामुळे उर्वरीत लिनन ज्याची मागणी श्री साईबाबा रुग्णालयापेक्षा वेगळी होती ते खरेदी करणेकामी कोटेशन मागविण्यात यावे असे ठरले होते त्याचा तपशील खाली नमुद केलेप्रमाणे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| अ.नं. | तपशील | कपडयाचा प्रकार | रंग | मागणी संख्या नगात |
|---|---|---|---|---|
| १ | गादया | फोम (Two Fold) | | ३०० |
| २ | पिलो | फोम | | ६०० |
| ३ | लेडीज पेशंट ब्लाऊज | कॉटन | चॉकलेटी रंग | ५०० |
| ४ | लेडीज पेशंट परकर | कॉटन | चॉकलेटी रंग | ५०० |
| ५ | मॅकीनटोस (रेक्झीन) | | चॉकलेटी रंग | ६०० मीटर |
| ६ | लहान होलशीट | कॉटन | हिरवा रंग | १००० नग |
| ७ | आय टॉवेल | कॉटन | हिरवा रंग | १०० नग |
| ८ | कॉटन गादया | कॉटन | | ५० नग |

उपरोक्त लिननसाठी मा.व्यवस्थापन समिती सभा दिनांक २७/०२/२०११ चे सभेमध्ये चर्चा/ वाटाघाटी करुन अ.नं.३ ते ७ करीता मे. के.सी.एम इंटरनॅशनल,जयपुर यांचेकडुन खरेदी करणेबाबत निर्णय झालेला होता तर अ.नं.१,२ व ८ याकरीता फेरकोटेशन मागविणेबाबत निर्णय झालेला होता.

त्यानुसार इकडील पत्र क्र.७३३३ दिनांक १७/०३/२०११ नुसार एकुण २४ पुरवठाधारकांकडुन गादयांचे नमुन्यासह सिलबंद कोटेशन दिनांक ३१/०३/२०११ अखेर मागविले होते त्यानुसार खालीलप्रमाणे पुरवठाधारकांचे कोटेशन प्राप्त झाले आहेत.

| अ.नं. | पुरवठाधारकांचे नाव | प्राप्त दिनांक |
|---|---|---|
| १ | मे.व्यंकटेश फर्निशिंग,राहाता | २५/०३/२०११ |
| २ | मे.क्वाली सर्ज सर्जिकल प्रा.लि.पुणे | ३०/०३/२०११ |
| ३ | मे.महाराष्ट्र स्मॉल स्केल इंडस्ट्रिज,नाशिक | ३१/०३/२०११ |
| ४ | मे.स्लिपईजी,अहमदनगर | ३१/०३/२०११ |
| ५ | मे. अजय एजन्सी, नाशिक | ३१/०३/२०११ |
| ६ | मे.अनुराग मेडीकल्स ॲन्ड सर्जिकल,पुणे | ०१/०४/२०११ |
| ७ | मे.बन्सल ट्रेडींग कंपनी,भोपाळ | ०१/०४/२०११ |

उपरोक्तपैकी अ.नं.७ यांचे कोटेशन फॅक्सव्दारे प्राप्त झालेले आहे, जास्तीत जास्त तुलनात्मक दर मिळणेचे दृष्टिने ते देखील विचारात घ्यावे असे मत आहे.

त्यानुसार उपरोक्तप्रमाणे सात बंद कोटेशन मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे समक्ष उघडुन त्याच वेळी तुलनात्मक तक्ता तायार केला सर्व पुरवठा धारकांना चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणेस आजचे सभेपुढे नमुने घेऊन बोलविण्यात आले होते त्यामध्ये आजचे सभेपुढे मे.क्वालि सर्ज,पुणे वगळता सर्व पुरवठा धारक नमुने घेऊन उपस्थित होते. त्यांनी सभेपुढे चर्चा/वाटाघाटी केल्यानंतर खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहे.

**गादी फोम (Two Fold)-**

| अ.नं. | कपंनीचे नाव | मागणी संख्या नगात | साईज | वर्णन | एकण किंमत रु./पै | मुळ दर व्हॅटसह रु./पै. | चर्चा / वाटाघाटी नंतरचे दर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | **मे.व्यंकटेश फर्निशिंग,राहाता** | ३०० | ३६" x७७" x४" | गादी फोम (Two Fold) | | Rs.२७८०.०० (४०D Make Cenflex ४इंच थिकनेस) Rs.२२००.०० (३२D फोम व रेक्झीन ४ इंच मजुरीसह) | **No Discount** |
| | | | | | | Rs २९००.०० (८० D ३" Bonded) फोम व रेक्झीन ४ इंच मजुरीसह) | |
| | | | | | | Rs.२०००/- (३२ D Turob) व रेग्झीन ४ इंच मजुरीसह Rs.२३००.०० (२ Hitlon) + २ इंच Ceflex व रेक्झीन ४ इंच मजुरीसह | |
| ०२ | **मे.क्वाली सर्ज सर्जिकल प्रा.लि.पुणे** | | | | | Rs.३६९०/- (३२ Density २/३ fold with rexine cover ) | **अनुपस्थित** |
| ०३ | **मे.महाराष्ट्र स्मॉल** | | | | | Rs.३२००.०० | |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **स्केल इंडस्ट्रिज, नाशिक** | | | | | | Rs.३०४०.०० |
| ०४ | **मे.स्लिपईजी, अहमदनगर** | | | | | ३२ Density PNP Rexine Rs.३२७३.०० (Navy Blue colour ST Grade Rexine Rs.३३३८.०० (Blue colour) Soft Rexine Rs.३४३६.०० (Brown colour) | ३२ Density Rs.२९४६.०० PNP Rexin Navy Blue Colour Rs.३००४.०० ST Grade Rexine Rs.३०९२.०० (Blue colour) Soft. Rexine (Brown colour) |
| | | | | | | ४० Density PNP Rexine Rs ३५२२.०० (Navy Blue colour S.T. Grade Rexine (Blue colour) Rs.३५८८.००Soft Rexine Rs. ३६८६.०० (Brown colour) | ४० Density Rs.३१७०.०० PNP Rexine Rs.३२२९.०० S.T. Grade Rexine Rs.३२२९.०० Soft. Rexine (Brown colour) |
| ०५ | **मे. अजय एजन्सी, नाशिक** | | | | | Rs.३३००.०० | Rs.३२३४.०० |
| ०६ | **मे.अनुराग मेडीकल्स ॲन्ड सर्जिकल,पुणे** | | | | | ४० Density Rs.३८२५०० ३२ Density Rs.३४८८.०० २८ Density Rs.३१५०.०० | ४० Density Rs.३६३४.०० ३२ Density Rs.३३१४.०० २८ Density Rs.२९९३.०० |
| ०७ | **मे.बन्सल ट्रेडींग कंपनी, भोपाळ** | | | | | ३२ Density Rs.२७३६.०० ४० Density Rs.३०७२.०० | ४० Density Per Rs.२९०७.०० |

## पिलो-

| अ.नं. | कपंनीचे नाव | **मागणी संख्या नगात** | **साईज** | **वर्णन** | **मुळ दर व्हॅटसह रु./पै.** | **चर्चा / वाटाघाटी नंतरचे दर** |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | **मे.व्यंकटेश फर्निशिंग, राहाता** | ६०० | १६"x २२" | पिलो फोम | ३२ D Foam Rs.२८०.०० | **No Discount** |
| ०२ | **मे.क्वाली सर्ज सर्जिकल प्रा.लि.पुणे** | | | | Rs १८०.०० Poly Fiber filled Washable with Rexine cover, Rs २२०.५० Reliance Recron Fiber filled | **अनुपस्थित** |
| ०३ | **मे.महाराष्ट्र स्मॉल स्केल इंडस्ट्रिज, नाशिक** | | | | Rs. २८०.०० | Rs २६६.०० |
| ०४ | **मे.स्लिपईजी, अहमदनगर** | | | | PNP Rexine Rs २५६.०० (Navy Blue colour) ST Grade | PNP Rexine Rs २३०.०० ST Grade |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | Rexine Rs २६५.०० (Blue colour) Soft Rexine Rs २८०.०० (Brown colour) | Rexine Rs २३८.०० Soft Rexine Rs २५२.०० |
| ०५ | **मे. अजय एजन्सी, नाशिक** | | | | रु. १७५.०० | रु. १७२.०० |
| ०६ | **मे.अनुराग मेडीकल्स ॲन्ड सर्जिकल,पुणे** | | | | ४० Density Rs ४२२.०० ३२ Density Rs ३६६.०० २८ Density Rs ३३८.०० | ४० Density Rs ४०१.०० ३२ Density Rs ३४८.०० २८ Density Rs ३२१.०० |
| ०७ | **मे.बन्सल ट्रेडींग कंपनी, भोपाळ** | | | | रु. २८५.०० (५५० G.S.M.) | रु. २७५.०० |

**कॉटन गादया-**

| अ.नं. | कपंनीचे नाव | **मागणी संख्या नगात** | **साईज** | **वर्णन** | **मुळ दर व्हॅटसह रु./पै.** | **चर्चा / वाटाघाटी नंतरचे दर** |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | **मे.व्यंकटेश फर्निशिंग, राहाता** | ५० | १० किलो ३६"x ७७" x४" | कॉटन गादया | Rs.११००.०० मजुरीसह | **No Discount** |
| ०२ | **मे.क्वाली सर्ज सर्जिकल प्रा.लि.पुणे** | | | | Rs.८१०.००with cotton cover | **अनुपस्थित** |
| ०३ | **मे.महाराष्ट्र स्मॉल स्केल इंडस्ट्रिज,नाशिक** | | | | Rs.८२५.०० | Rs.७८४.०० |
| ०४ | **मे.स्लिपईजी, अहमदनगर** | | | | Rs.४५८.०० Jeans Cotton Rs.५५४.०० White cotton with cotton cloth | Rs.४३५.०० Jeans Cotton Rs.५२६.०० White cotton with cotton cloth |
| ०५ | **मे. अजय एजन्सी, नाशिक** | | | | रु.७७६.०० | Rs.७६०.०० |
| ०६ | **मे.अनुराग मेडीकल्स ॲन्ड सर्जिकल,पुणे** | | | | N.Q. | N.Q. |
| ०७ | **मे.बन्सल ट्रेडींग कंपनी, भोपाळ** | | | | Rs.१०८३.०० wargin | Rs.१०००.०० Withe cotton cover |

**निर्णय क्र. २९३ यावर चर्चा होऊन उपरोक्तप्रमाणे सर्वांचे गादया व पिलोचे नमुने पाहता मे.कॉनटॅक कंफोर्ट(स्लिपईजी) अहमदनगर यांनी सादर केलेल्या नमुन्यापैकी फोम गादीसाठी ४० Density चे ST GradeRexine या कंपनीचे सुटीनंतरचे दर रु.३२२९/- स्विकारण्यात यावे तसेच फोम पिलोकरीता ST GradeRexine चे दर रु.२३८/- तर कॉटन (१० किलो)गादीसाठी White Cotton गादी दर प्रती नग रु.५२६/- स्विकारणेस व याकामी येणाऱ्या रु.११,३७,८००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१३ श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता सोलापुरी चादर खरेदीकामी चर्चा/वाटाघाटीकरुन निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयासाठी एकुण १००० नग सोलापुरी चादर खरेदीस मा.व्यवस्थापन सभा दि. ०७/०८/२०१० निर्णय क्रमांक ६२७ अन्वये अंदाजे रु.१९६/- प्रती नग प्रमाणे एकुण रु.१,९६,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

श्री साईबाबा रुग्णालयाकरीता एकुण १०० नग सोलापुरी चादर मा.व्यवस्थापन सभा दिनांक २७/०१/२०१० निर्णय क्रमांक २१२ अन्वये प्रती नग रु.१९६/-प्रमाणे एकुण रु.१९६००/-चे खर्चास मान्यता मिळालेली आहे. परंतु मा.व्यवस्थापन सभा दिनांक १०/१०/२०१० चे सभेत यावर चर्चा होऊन संस्थानचे खरेदी विभागाकडुन नविन १००० साईआश्रम इमारतीतील खोल्यांकरीता चादरी खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे त्याचमध्ये रुग्णालयाच्या चादरी खरेदी करण्यात यावे म्हणजे कमीत कमी दर मिळणेस मदत होईल असा निर्णय झालेला आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



उपरोक्तप्रमाणे एकुण ११०० चादरी खरेदीविभागाकडुन खरेदीकरुन मिळणेस व त्यापैकी श्री साईबाबा रुग्णालयाकरीता ५०० नग व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता ६०० नग घेऊन त्यावर रुग्णालयाचे नाव एम्ब्रॉयडरी करुन मिळणेचा प्रस्ताव खरेदी विभागाकडे दि.०३/११/२०१० रोजी देण्यात आलेला आहे.

परंतु सदर चादरीची खरेदी प्रशासकीय अधिकारी श्रीयुत बी.डी.साबळे साहेब यांचेकडुन चालु आहे असे खरेदी विभागाने कळविले होते. तेव्हा त्याबाबद श्रीयुत साबळे साहेब यांचेशी दिनांक ०६/०३/२०११ रोजी चर्चा केली असता अदयाप चादरींचे नमुने पाहण्यासाठी मा.विश्वस्तांना घेऊन जावयाचे आहे त्यानंतर पुढील निर्णय होणार आहे.

खरेदी विभागाकडुन चादरी उपलब्ध होण्यास अंदाजे ४ ते ५ महिन्याचा कालावधी लागेल असा अंदाज आहे त्यामुळे तुर्तास रुग्णालयास चौकशी विभागाकडुन २०० चादरी आणल्या होत्या परंतु त्याचा दर्जा इतकासा चांगल्या प्रतीचा नाही त्यामुळे रुग्णालयास खरेदी विभागाकडुन चादरी उपलब्ध होईपर्यंत ३०० नग चादरी तातडीने कोटेशन मागवुन खरेदी करता येईल. त्यासाठी प्रती चादर अंदाजे रु.२५०/- प्रमाणे ३०० नग चादर खरेदीस रु.७५०००/- पर्यंत खर्च अपेक्षीत आहे.

उपरोक्तप्रमाणे सोलापुरी चादर विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे खर्चास मा.व्यवस्थापन सभा दिनांक २६/०३/२०११ चे सभेत मान्यता मिळाली असुन त्यानुसार इकडील पत्र क्रमांक १३५ दिनांक ०९/०४/२०११ अन्वये एकुण १७ पुरवठा धारकांकडुन दिनांक २५/०४/२०११ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते त्यानुसार खालील पुरवठाधारकांचे कोटेशन प्राप्त झालेले होते.

| **अ.नं.** | **पुरवठाधारकाचे नाव** | **प्राप्त दिनांक** |
|---|---|---|
| १ | मे.निकीता डिस्ट्रिब्युटर्स, औरंगाबाद | २३/०४/२०११ |
| २ | मे.अजय एजन्सी,नाशिक | २३/०४/२०११ |
| ३ | मे.केसीम इंटरनॅशनल,जयपुर | २३/०४/२०११ |
| ४ | मे.तुलसी एम्पोरीयम,सोनई | २५/०४/२०११ |
| ५ | मे.राजेंद्र क्लॉथ स्टोअर,राहुरी | २५/०४/२०११ |

तरी उपरोक्तप्रमाणे पाच कोटेशन वैद्यकीय संचालक यांचेसमोर दि.२८/०४/२०११ रोजी समक्ष उघडले असुन त्याचा तुलनात्मक तक्ता सोबत सादर केला आहे. उपरोक्त ५ कोटेशन धारकांपैकी फक्त मे.तुलसी एम्पोरीयम, सोनई यांनीच कोटेशन सोबत चादरचा नमूना दिलेला होता परंतु सर्वांचे नमुने समक्ष बघीतले नंतरच अंतिम निर्णय घेता येऊ शकेल त्यामुळे सर्व पुरवठा धारकांना आजचे सभेपुढे चर्चा / वाटाघाटीकरीता समक्ष नमुना घेऊनबोलविण्यात आलेले होते त्यापैकी मे.निकीता डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद व मे.अजय एजन्सी,नाशिक हे दोनच पुरवठा धारक उपस्थित होते त्यांनी तसेच मे. तुलसी एम्पोरीयम, सोनई हे आजचे सभेपुढे समक्ष चर्चा/वाटाघाटीकरीता येऊ शकले नव्हते परंतु त्यांनी चादरीचा नमुना दिलेला होता त्यामुळे त्यांचेशी सभेमधुन दुरध्वनीवरुन दरात अजुन काही सुट देऊ शकता असे विचारणा केली असता त्यांनी ५% सुट देऊ केलेली आहे.

| अ.नं. | कंपनीचे नाव | **मागणी संख्या नगात** | **साईज** | **वर्णन** | **एकण किंमत रु./पै** | **मुळ दर व्हॅटसह रु./पै.** | **चर्चा / वाटाघाटी नंतरचे दर** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **०१** | **तुलसी एम्पोरीयम, सोनई** | ३०० | ६०इंच x९० इंच | मयुर पंख मोरनी स्पेशल वजन १२०० ते १२५० ग्रॅम | ३३५.०० | १००५००.०० | ३१८.०० |
| | | | | बिरु ॲन्ड बिरु मोरनी १३०० ग्रॅम | ३९५.०० | ११८५००.०० | ३७५.०० |
| **०२** | **राजेंद्र क्लॉथ स्टोअर्स, राहुरी** | ३०० | ६०इंच x९० इंच | एन एन श्रीकोंडा मयुरपेख १२०० ग्रॅम | ३४५.०० | १०३५००.०० | **अनुपस्थित** |
| **०३** | **अजय एजन्सी, नाशिक** | ३०० | ६०इंच x९० इंच | कॉटन | ३३८.०० | १०१४००.०० | ३२१.०० |
| **०४** | **निकीता डिस्ट्रिब्युटर्स, औरंगाबाद** | ३०० | ६०इंच x९० इंच | कॉटन | ३९०.०० | ११७०००0.०० | ३७५.०० |
| **०५** | **मे.केसीएम इंटरनॅशनल, जयपुर** | ३०० | ६०इंच x९० इंच | कॉटन | २४५.०० | ७३५००.०० | **अनुपस्थित** |

**निर्णय क्र. २९४ यावर चर्चा होऊन उपरोक्त प्रमाणे चर्चा/वाटाघाटीचे वेळेस प्राप्त चादरींचा नमुना समक्ष पाहणी केल्यानंतर मे.निकीता डिस्ट्रिब्युटर्स, औरंगाबाद यांचा चादरीचा नमुना योग्य वाटला त्यामुळे**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**मे.निकीता डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद यांचेकडुन ३०० नग चादरी प्र.नग रु.३७५/- प्रमाणे खरेदीस करण्यात यावे व याकामी येणाऱ्या रु.१,१२,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१४** **संस्थान परिसरातील नारळ फळे (शहाळे ) विक्री करणे बाबतची कोटेशन उघडून निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** बगीचा विभागामार्फत संस्थान परिसरामध्ये साठवण तलावाच्या चारही बाजुने व पश्चिमेला आंबा-नारळ बागेत, धर्मशाळा परिसर, साईनगर, नविन भक्त निवास परिसर, शैक्षणिक संकुल परिसरात एकुण १५०० नारळ झाडे लावण्यात आलेले आहे. सदर झाडांना गेली ३ ते ४ वर्षापासुन चांगल्या प्रमाणात फळे येण्यास सुरुवात झालेली आहे. आपण मागील वर्षी या नारळ फळांची विक्री करणेकामी दरपत्रके मागवुन त्यांची खोती दिलेली होती. सदरच्या खोतीचा कालावधी माहे -फेब्रुवारी अखेर संपलेली आहे.

मागील ०३ वर्षात नारळ फळे (शहाळे) यांचे खालील प्रमाणे उत्पादन मिळालेले आहे

| अ.न. | सन | रक्कम |
|---|---|---|
| ०१ | २००८ | रु. १,८६,११०/- |
| ०२ | २००९ | रु. ३,१३,२२०/- |
| ०३ | २०१० | रु. ४,११,०००/- |
| ०४ | २०११ ( मार्च व एप्रिल) | रु. १,०२,३१०/- |

सन २०११ (माहे- जुन २०११ ते मार्च २०१२) या कालावधीत संस्थान परिसरात निघणा-या फळांची खोती देवुन (प्रती फळांचे दर घेवुन ) विक्री करणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक१३/०२/२०१११. रोजीचे सभेत निर्णय क्र ३२ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

जा.न.एसएसएस/वशी /बगीचा-७३६/२०११. दि.१५/०५/२०११.अन्वये स्थानिक बागवान / फळविक्रते यांच्या कडून दरपत्रक मागविण्यात आले आहेत. दरपत्रक जमा करण्याची शेवटीची तारीख १६/०५/२०११. अशी ठेवण्यात आलेली आहे.

उपरोक्त मुदतीत खालीलप्रमाणे दरपत्रके प्राप्त झालेले आहेत.

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव | कोटेशन्समधील दर प्रति नग रुपये | चर्चेअंती देऊ केलेले दर प्रति नग रुपये |
|---|---|---|---|
| १ | श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप सोसायटी लि.शिर्डी | ३/- | ३/- |
| २ | श्री ज्ञानेश्वर नामदेव मुरादे, खडके वाके ता.राहाता जि.अहमदनगर | ८.५० | ८.५० |
| ३ | श्री आशपाक अजीज पठाण, धारणगांव रोड कोपरगांव जि.अहमदनगर | ६.५० | ८.५० |

**निर्णय क्र. २९५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री ज्ञानेश्वर नामदेव मुरादे, खडकेवाके व श्री आशपाक अजीज पठाण, धारणगांव रोड कोपरगांव यांचे उच्चतम दर स्विकारण्यात येऊन त्यांना विभागून कार्यादेश देण्यात यावा,किंवा जे फळ विक्रते नारळ फळे स्व-खर्चाने काढून घेण्यास तयार असतील अशा फळ विक्रेत्यांना रुपये ८.५० प्रति नारळ या दराने विक्री करण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.१५** **स्कुलबस क्र. एमएच-१७/सी-८८५१ करीता नविन बॉडी तयार करुन घेणे कामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडुन वाटाघाटीअंती निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** दि.१३/०२/२०११ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं.११५ (ब) अन्वये, जाहिर लिलावाने विक्री करावयाच्या वाहनांतून वगळण्यात आलेल्या अ.नं.०५ वाहन क्रं.एमएच-१७/सी-८८५१ स्कुलबस करीता बॉडीबिल्डर यांचेकडून नवीन बॉडी तयार करुन घेणेत यावी, असे ठरले आहे.

वरील निर्णयानुसार, स्कुलबस करीता बॉडी बांधणी तयार करुन घेणे कामी खालील प्रमाणे बॉडी बिल्डर्स यांचेकडून जा.नं.एसएसएस/वाहन/८०२/२०११, दि.०६/०५/२०११ ने कोटेशन बोलाविण्यात आली होती.

| अ.नं. | पार्टीचे नांव |
|---|---|
| ०१. | जयानंद खिरा & कं. प्रा. लि., पुणे |
| ०२. | इन-कोच बिल्डर्स, मुंबई |
| ०३. | ॲन्थोनी गॅरेज प्रा. लि., नवी मुंबई |
| ०४. | आरको इंजिनिअर्स, पुणे |

उपरोक्त चार बॉडी बिल्डर्स पैकी खालील प्रमाणे चार कोटेशन प्राप्त झालेली आहेत.

| अ.नं. | पार्टीचे नांव | आवक नंबर / दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१. | जयानंद खिरा & कं. प्रा. लि., पुणे | २६४६-१२/०५/२०११ | उघडलेले कोटेशन |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | |
|---|---|---|---|
| ०२. | इन-कोच बिल्डर्स, मुंबई | २७६१-१३/०५/२०११ | बंद कोटेशन |
| ०३. | अॅन्थोनी गॅरेज प्रा. लि., नवी मुंबई | २७६२-१३/०५/२०११ | बंद कोटेशन |
| ०४. | आरको इंजिनिअर्स, पुणे | २७६३-१३/०५/२०११ | बंद कोटेशन |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले चार कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन बॉडी बिल्डर्सचे प्रतिनीधीशी चर्चा / वाटाघाटी करुन स्कुलबस क्रं.एमएच-१७/सी-८८५१ करीता जुनी बॉडी देवुन नवीन बॉडी बांधणी तयार करुन घेणे बाबत चर्चा केली असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | पार्टीचे नांव | कोटेशन्समधील दर रुपये (व्हॅटसह ) | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये (व्हॅटसह ) |
|---|---|---|---|
| **०१.** | **जयानंद खिरा & कं. प्रा. लि., पुणे** | **६,१७,६२४/-** | **६,२१,०००/-** |
| **०२.** | **इन-कोच बिल्डर्स, मुंबई** | **६,१७,६२५/-** | **६,०१,८७५/-** |
| **०३.** | **अॅन्थोनी गॅरेज प्रा. लि., नवी मुंबई** | **६,५६,५७५/-** | **अनुपस्थित** |
| **०४.** | **आरको इंजिनिअर्स, पुणे** | **७,०८,७५०/-** | **अनुपस्थित** |

**निर्णय क्र. २९६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, इन-कोच बिल्डर्स, मुंबई यांचे ५,३५,०००/-+व्हॅट (अॅल्यूमिनियम ग्रीलसह) निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

---

**विषय नं.१६** **श्री साईनाथ रुग्णालयाकरीता Peripheral nerve locator (Stimularor) with insulated needle खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील पॅथोलॉजी विभाग, श्री साईबाबा रुग्णालयातील आर्थोपडीक, जनरल व न्युरो ऑपरेशन थिएटर विभागाने काही मशिनरी / उपकरणे / फर्नीचरची मागणी केलेली आहे. कारण त्यांचेकडे सध्या असलेली काही मशिनरी /उपकरणे / फर्नीचर वापरुन खराब झालेले आहेत, तर काही नविन मशिनरी / उपकरणे / फर्नीचरची त्यांना आवश्यकता आहे.

मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०५/०९/२०१० रोजीचे सभेत निर्णय क्र.७०१ अन्वये सदरची मशिनरी / उपकरणे / फर्नीचर खरेदीकामी येणाऱ्या अंदाजे रु.१८,७२,८०५/- चे खर्चास व सदरची खरेदी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागवुन खरेदीस मान्यता मिळालेली आहे. त्यामध्ये उपरोक्त Peripheral nerve locator (Stimulator) with insulated needle खरेदीकामी रु.१,११,६३७.५० चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

सदरची जाहिरात महाराष्ट्र टाईम्स - मुंबई या इंग्रजी वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात आली होती, तसेच संस्थानचे संकेत स्थळावर देखील निविदा टाकण्यात आली होती. निविदा विक्रीची मुदत दि.०६/१०/२०१० ते १६/१०/२०१० पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकरण्याची अंतिम मुदत दि.१८/१०/२०१० अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकूण २० उत्पादक कंपन्या / पुरवठा धारक यांना इकडील पत्र क्र. ३६७३ दि.०४/१०/२०१० अन्वये जाहिराती बाबत अवगत करणेकामी पत्र पाठविण्यात आले होते.

त्यास अनुसरुन मुंबई कार्यालयात ५ निविदा तर शिर्डी येथील कार्यालयात १ निविदा अशा एकूण ६ निविदा प्राप्त झालेल्या होत्या.

उपरोक्त ०६ तांत्रिक बाबींच्या सिलबंद निविदा मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२१/११/२०१० रोजीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून त्यांचा तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता बनविण्यात आलेला होता. त्यामध्ये Peripheral nerve locator (Stimulator) with insulated needle खरेदीकामी M/s. Summit Healthcare (P) Ltd., Mumbai यांची एकच निविदा प्राप्त झालेली असून त्यामध्ये दोन प्रकारचे मॉडेल दिलेले आहे. त्यामधील त्यामधील HNS-१२ या मॉडेल करीता श्री साईबाबा रुग्णालयातील भूलतज्ञ डॉ.सुरवासे व डॉ. मराठे यांनी शिफारस केलेली आहे. तसेच आपणास खरेदीकामी कमीत कमी तीन निविदा आवश्यक असल्यामुळे याकामी मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१३/०२/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८६ अन्वये फेर कोटेशन मागविणेस मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार इकडील पत्र क्र. ७२३७ दि.१२/०३/२०११ अन्वये एकुण ४ अधिकृत विक्रेते / पुरवठा धारकांकडून दि.२५/०३/२०११ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनूसरुन M/s. B. Braun Medical (India) Pvt. Ltd., Mumbai यांचे १ बंद कोटेशन प्राप्त झालेले आहेत. तसेच वर्तमान पत्रातील जाहिरातीस अनूसरुन M/s. Summit Healthcare (P) Ltd., Mumbai यांची एकच निविदा प्राप्त झालेली होती M/s. Summit Healthcare (P) Ltd., Mumbai यांनी O.T. Table for Urology साठीचे दर सुध्दा सदर निविदेमध्ये दिल्यामुळे सदरची Commercial Bid ची निविदा ही मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१३/०२/२०११ चे सभेपुढे उघडण्यात आलेली आहे.

१. M/s. B. Braun Medical (India) Pvt. Ltd., Mumbai (कोटेशन प्राप्त दि.२४/०३/२०११)

याकामी वेळोवेळी तगादा करुन देखील कोटेशन उपलब्ध होत नाहीत, त्यामुळे वरील दोन कोटेशनवर निर्णय घ्यावा असे मत आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



तरी वरीलप्रमाणे प्राप्त एक सिलबंद कोटेशन समक्ष उघडून मिळणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.२९७** **श्री साईनाथ रुग्णालयाकरीता Peripheral nerve locator (Stimularor) with insulated needle खरेदीकामी प्राप्त झालेले दोन सिलबंद कोटेशन्स आजच्या सभेपुढे समक्ष उघडण्यात आले. या कोटेशन्सचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१७** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईबाबा रुग्णालयातील वार्षिक (सन २०११-२०१२) छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी प्राप्त निविदा उघडणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटल व श्रीसाईनाथ रुग्णालयामध्ये सर्व वार्ड / विभागात दैनंदिन वापरासाठी लागणारे वार्षिक (सन २०११ - २०१२) छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी मा.व्यवस्थापन समिती सभा दि. २७.०२.२०११ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये निविदा मागविणेस मान्यता मिळाली होती.

त्यानुसार सदरचे छपाईकामी लोकमत- अहमदनगर, सार्वमत - अमदनगर या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती तसेच संस्थानचे संकेत स्थळावर देखील जाहिरात देण्यात आली होती. त्यानुसार संस्थानचे शिर्डी व मुंबई येथील कार्यालयात दि.०५.०४.२०११ ते २१.०४.२०११ पर्यंत निविदा विक्री ठेवण्यात आली होती तर सिलबंद निविदा स्विकारण्याची अंतीम तारीख २३.०४.२०११ ठेवण्यात आली होती.

संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात छपाईचे एकूण १३ निविदांची विक्री झाली होती तर कार्यालयीन स्टेशनरीचे एकूण ०३ निविदांची विक्री झाली होती व त्यापैकी छपाईकामी एकूण ०९ तर कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी एकूण ०३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. मुंबई येथील कार्यालयात छपाई व कार्यालयीन स्टेशनरीची प्रत्येकी एक निविदा विक्री झाली असून तेथे एकही निविदा प्राप्त झालेली नाही. वरील सर्व निविदा शिर्डी कार्यालयात प्राप्त झाल्या असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

**अ) छपाई -**

१) मे. क्लासिक स्टेशनर्स, को., मुंबई (१ बंद निविदा प्राप्त दि.२३.०४.२०११)
२) मे. ममता ऑफसेट, अहमदनगर (१ बंद निविदा प्राप्त दि.२३.०४.२०११)
३) मे. रोहन प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स, औरंगाबाद (२ बंद निविदा प्राप्त दि.२३.०४.२०११)
४) मे. डेसिजनर्स क्रिएशन, नाशिक (२ बंद निविदा प्राप्त दि.२३.०४.२०११)
५) मे. कृष्णा एंटरप्रायजेस, अहमदाबाद (१ बंद निविदा प्राप्त दि.२३.०४.२०११)
६) मे. कॅप्रिकॉन प्रिंटर्स, पुणे (२ बंद निविदा प्राप्त दि.२३.०४.२०११)
७) मे. मॉर्डन ऑफसेट, नाशिक (१ बंद निविदा प्राप्त दि.२३.०४.२०११)
८) मे. अविराज पॅकवेल, कोपरगांव (१ बंद निविदा प्राप्त दि.२३.०४.२०११)

**ब) कार्यालयीन स्टेशनरी -**

१) मे. क्लासिक स्टेशनर्स, को., मुंबई (१ बंद निविदा प्राप्त दि.२३.०४.२०११)
२) मे. ज्योती बुक सेलर्स ॲण्ड स्टेशनर्स, नाशिक (१ बंद निविदा प्राप्त दि.२३.०४.२०११)
३) मे. साई ॲटोमेशन, अहमदनगर (१ बंद निविदा प्राप्त दि.२५.०४.२०११)

तरी वरीलप्रमाणे **अ** व **ब** मिळूण प्राप्त झालेल्या एकूण ११ सिलबंद निविदा समक्ष उघडून मिळणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र. २९८** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईबाबा रुग्णालयातील वार्षिक (सन २०११-२०१२) छपाई व कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी प्राप्त झालेल्या ११ सिलबंद निविदा आजच्या सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या. तसेच उपरोक्त अ पैकी मे.ओम प्रिन्टर्स, कोपरगाव यांनी मुदतीनंतर निविदा सादर केली होती. सर्व निविदा बंद स्थितीत असल्यामुळे सदर निविदा उघडून स्विकारण्यात येऊन सर्व निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा, असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१८** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयासाठी सन २०११-२०१२ या वर्षाकरीता वार्षीक औषधे खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालय व श्री साईनाथ रुग्णालयासाठी सन २०११-२०१२ या वर्षाकरीता लागणाऱ्या वार्षिक औषधे खरेदीकामी अंदाजे रु.३१,०२,९७,३००/- चे खरेदीचा व खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२६/०३/२०११ चे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. सदरचे सभेत वार्षिक औषधे खरेदीकामी संस्थानचे विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन थेट उत्पादक कंपन्यांना संस्थान खर्चाने पत्र पाठविण्यात यावे तसेच संस्थानचे संकेत स्थळावर देखील निविदा देण्यात यावी, असे ठरले होते.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



त्यानुसार उपरोक्त वार्षिक औषधे खरेदीकामी सकाळ - पुणे, इंडियन एक्सप्रेस - मुंबई, लोकमत- औरंगाबाद या वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच संस्थानच्या संकेत स्थळावर निविदा देण्यात आली होती. त्यानुसार दि.११/०४/२०११ ते दि. २७/०४/२०११ अखेर संस्थानचे शिर्डी व मुंबई येथील कार्यालयात निविदा फॉर्म विक्रीसाठी ठेवण्यात आलेल्या होत्या. निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२९/०४/२०११ अखेर ठेवण्यात आलेली होती. तसेच एकुण १८३ कंपन्याना इकडील पत्र क्र.१६४ दि.१३/०४/२०११ अन्वये जाहिरातीबद्दल अवगत करण्यात आले होते.

सदरच्या जाहिरातीस अनुसरुन शिर्डी व मुंबई कार्यालयात एकूण १४४ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्या खालील प्रमाणे-

| S.No | Name of Tenderer | S.No | Name of Tenderer |
|---|---|---|---|
| 1 | Aashirwad Agencies, Nashik | 73 | Cadila Pharmaceuticals Ltd,A.bad |
| 2 | Ace Medical Technology,Aurangabad | 74 | Centaur Pharmaceuticals Pvt. Ltd., Mumbai |
| 3 | Advance Technologies, Bhopal | 75 | Chetna Enterprises, Ahmednagar |
| 4 | Ajinkya Medical Agencies, A.nagar | 76 | Choksi Imaging Limited, Mumbai |
| 5 | Alkem Laboratories Ltd, Mumbai | 77 | Cosmos Enterprises, Mumbai |
| 6 | Allwin Life Care, Mumbai | 78 | Critical Care Systems, Pune |
| 7 | Anita Medical Systems Pvt. Ltd., Mumbai | 79 | Drugs India, Nashik |
| 8 | Atlantic Pharmaceuticals, Mumbai | 80 | Dynamicro Labs Pvt. Ltd., Thane (2 Enevelop) |
| 9 | Austin Healthcare, Pune | 81 | Eastern Medikit Ltd., Delhi |
| 10 | B.Braun Medical (India) Pvt. Ltd. Mumbai | 82 | Emami Limited (Zandu Product Division), Mumbai |
| 11 | Bicton Dickinson India Pvt. Ltd., Mumbai | 83 | Emami Limited (Zandu Pharmaceuticals), Mumbai |
| 12 | Biochem Pharmaceutical Industries Ltd., Mumbai | 84 | Franco Indian Pharmaceuticals Pvt. Ltd., Mumbai |
| 13 | Biomedicon Systems (I) Pvt. Ltd., Mumbai | 85 | Fujifilm India Private Limited, Mumbai |
| 14 | Bioscience Medical Devices India Pvt. Ltd., Thane | 86 | G & G Medicaid, Ahmednagar |
| 15 | Bioshields, Goa | 87 | Gagan Pharma, Mumbai |
| 16 | Bora Agencies, Ahmednagar | 88 | Gandhi Enterprises, Ahmedngar |
| 17 | Global Medical Devices, Pune | 89 | Mil Laboratories Pvt.Ltd., Mumbai |
| 18 | Gufic Biosciences Limited, Mumbai | 90 | Milan Enterprises, Ahmednagar |
| 19 | Gurukrupa Agencies, Kopargaon | 91 | Millenium Surgicals, Mumbai |
| 20 | H&H Pharmaceutical (I) Ltd., Mumbai | 92 | MRK Healthcare, Mumbai |
| 21 | Hansraj Nayyar Medical India, Mumbai | 93 | Munot Medical Agencies, Manmad. |
| 22 | Heart Care Pharma Services Pvt. Ltd., Mumbai | 94 | N.P. Agencies, Mumbai |
| 23 | Heart Beat Intervention Pvt. Ltd., Surat | 95 | Nagarjun Marketing Services, Nashik |
| 24 | Hestar Diagnostics Pvt.Ltd., Mumbai | 96 | Namoh Agencies,Ahmednagar |
| 25 | Hi-Tech Surgical Systems, Mumbai | 97 | Navshakti Ayurvedalya Pvt Ltd., Bhusalwal |
| 26 | HLL Lifecare Ltd., Mumbai | 98 | Nipro India Corp. Pvt. Ltd., Chennai |
| 27 | Hrushikesh Pharma Care, Sangamner | 99 | Nirmal Agencies, Ahmednagar |
| 28 | Human Touch Technologies, Pune | 100 | Om Agencies, Aurangabad |
| 29 | ICPA Health Products Ltd., Mumbai | 101 | Om Enterprises, Aurangabad |
| 30 | Imaging Products Ind. Ltd., Mumbai | 102 | Om Health Solutions Pvt. Ltd., Surat |
| 31 | Indu Pharma, Jejuri | 103 | Omni Lens Pvt.Ltd., Ahmedabad |
| 32 | Inga Laboratories Pvt. Ltd., Mumbai | 104 | Palmaz Blue Technologies, Pune |
| 33 | Inncare Specialities, Nashik | 105 | Panacea Biomedicals, Pune (4 Enevelop) |
| 34 | Inter Medics, Mumbai | 106 | Pankaj Pharma, Pune |
| 35 | J.S.P.Surgical, Nashik | 107 | Parshwanath Distributors, Mumbai |
| 36 | JCPL Pharma Pvt. Ltd., Jalgaon | 108 | Pharmaco, Pune |
| 37 | Johnson & Johnson Limited, Mumbai (ASP Division) | 109 | Pharmaveda (I) Pvt.Ltd., Mumbai |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | |
|---|---|---|---|
| 38 | Johnson & Johnson Limited, Mumbai (Ethicon Division) | 110 | R.R. Diagnostics, Dhule |
| 39 | Kabra Medicals, Jalgaon | 111 | Rahul Brothers, Mumbai |
| 40 | Kaivalyam Surgicals, Shrirampur | 112 | Rahul Healthcare Corporation, Pune |
| 41 | Kalelker Surgicals Pvt. Ltd., Mumbai | 113 | Raman & Weil Pvt. Ltd., Mumbai |
| 42 | Kalpak Marketing Pvt. Ltd., Pune | 114 | Renuka Surgical Systems, A.bad |
| 43 | Kanchan Drugs Pvt.Ltd., Pune | 115 | RPG Life Sciences Limited, Mumbai |
| 44 | Kapil Medicals, Jalgaon | 116 | S.S. Scientific Co, Dhule |
| 45 | Karan Ayurvedics, Nashik | 117 | Sahajananad Medical Technologies Pvt. Ltd., Surat |
| 46 | Karnataka Antibiotics & Pharmaceuticals Ltd., Mumbai | 118 | Sai Medical Systems, Bhopal |
| 47 | Karwa Agencies, Sangamner | 119 | Sanjay Agencies, Ahmednagar. |
| 48 | Kaustubh Enterprises, Mumbai | 120 | Sanjivani Medical Stores,A.nagar |
| 49 | Keps Pharma, Mumbai | 121 | Saraswati Agencies, Ahmednagar |
| 50 | Laxmi Pharmaceuticals, Mumbai | 122 | SAS Enterprises, Aurangabad |
| 51 | Lotus Surgicals Pvt. Ltd., Mumbai | 123 | Scimed Technologies Pvt.Ltd., Mumbai |
| 52 | Mahesh Surgical & Pharmaceuticals, Pune | 124 | Seva Medical Equipment Pvt. Ltd., Pune |
| 53 | Maureen Surgical Company, Aurangabad | 125 | Shiddheshawar Medical & Gernaral Stores, Ahmednagar |
| 54 | Shivam Trading Company, Mumbai | 126 | Sushrut Natural Health Care Pvt.Ltd., Ahmednagar |
| 55 | Shree Enterprises, Pune | 127 | Sushruta Medical Systems, Pune |
| 56 | Shree Jhalani Agencies, Ahmednagar | 128 | Tirupati Enterprises, Pune |
| 57 | Shree Ortho Tools, Nashik | 129 | Transasia Bio-Medicals Ltd., Mumbai |
| 58 | Shree Raamesh Pharma, Pune | 130 | Trilok Agency, Shrirampur |
| 59 | Shree Renuka Agency, Nagpur | 131 | Trimurti Agencies, Nashik |
| 60 | Shreeji Agency, Shrirampur | 132 | Trimurti Enterprises, Sillod |
| 61 | Shreya Enterprises, Ahmednagar | 133 | Tyco Healthcare India Pvt. Ltd., Mumbai |
| 62 | Shri Balaji Medical & Pharmaceutical Distributor, Nashik (2 Enevelop) | 134 | Unichem Laboratories Ltd., Mumbai |
| 63 | Shri Sai Care Pharmaceutical & Surgicals, Kopargaon | 135 | Universal Chemicals, Nashik |
| 64 | Shree Surya Surgi Pharma Pvt. Ltd., Nashik | 136 | Universal Distributors, Pune |
| 65 | Shriram Distributors, Pune | 137 | Vascular Concepts Ltd., Mumbai |
| 66 | Siddhi Medical Distributors, Aurangabad | 138 | Veritaz Healthcare Limited, Hyderabad |
| 67 | Snehal Enterprises, Nagpur | 139 | Vikrant Surgicals, Pune |
| 68 | Spandan Biotech, Aurangabad. | 140 | Vishal Agencies, Ahmednagar. |
| 69 | Speciality Surgimed, Pune | 141 | Yoga Enterprises, Pune |
| 70 | Steranco Health Care Pvt.Ltd., Mumbai | 142 | Zenith Surgical Co., Mumbai |
| 71 | Suretech Medical Inc., Mumbai | 143 | Emergent Medi-Tech (India) Pvt. Ltd, Mumbai |
| 72 | Surya Surgi Pharma, Nashik | 144 | Pharmacea Link, Pune |

तरी वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या एकुण १४४ सिलबंद निविदा समक्ष उघडून मिळणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र. २९९** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयासाठी सन २०११-२०१२ या वर्षाकरीता वार्षीक औषधे खरेदीकामी प्राप्त झालेल्या एकुण १४४ सिलबंद निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या. या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पूढील सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१९** **श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागासाठी Fully Automatic Biochemistry Analyser मशिन खरेदीकामी प्राप्त तांत्रिक बाबींच्या (Technical Bid)निविदा उघडणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाने दि.०४/०२/२०११ चे मागणी पत्रान्वये १ नग Fully Automatic Biochemistry Analyser मशिनची मागणी केलेली आहे. कारण सध्या सदर विभागाकडे Biochemistry Analyser साठी एक मशिन उपलब्ध असून ते तीन वर्ष इतके जूने आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



त्यावर दररोज सरासरी ३५० ते ४०० तपासण्या कराव्या लागतात त्यामुळे सदर मशिनवर जास्त प्रमाणात बोजा पडत आहे तसेच सदर मशिन मध्ये काही कारणास्तव अचानक बिघाड झाल्यास सर्व तपासण्याचे काम बंद पडते व कामाची गैरसोय होते. त्यामुळे अजून एक मशिन घेतल्यास तपासण्या विभागून जातील व दैनंदिन तपासण्यांना वेळ लागणार नाही तसेच जुन्या मशिनवर कामाचा बोजा देखील पडणार नाही. नविन मशिन जर Fully Automatic घेतले तर तपासणीचे Reading Print Out लगेच मिळेल हा त्याचा फायदा आहे.

उपरोक्त मशिनचे अंदाजे खर्चासाठी दर पत्रक मे. ट्रान्साशिया बायो मेडीकल लि., मुंबई यांचेकडून मागविले असता त्यांनी त्यांचे दि.२४/०२/२०११ चे ई-मेल पत्राद्वारे अंदाजे रु.१०,००,०००/- इतका खर्च कळविला आहे.

त्यानूसार श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागासाठी १ नग Fully Automatic Biochemistry Analyser मशिन विहित पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१०,००,०००/- चे खर्चास मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२६/०३/२०११ रोजीचे सभेत मान्यता मिळालेली आहे.

सदरच्या खरेदीची रक्कम जास्त असल्याने जास्तीत जास्त प्रतिसाद मिळणेकामी सदरची जाहिरात सकाळ - पुणे, इंडीयन एक्सप्रेस-मुंबई आणि लोकमत - औरंगाबाद या वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात आली होती, तसेच संस्थानचे संकेत स्थळावर देखील निविदा देण्यात आली होती.

निविदा विक्रीची मुदत दि. ११/०४/२०११ ते २७/०४/२०११ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकरण्याची अंतिम मुदत दि.२९/०४/२०११ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकूण १३ उत्पादक कंपन्या / पुरवठा धारक यांना इकडील पत्र क्र. १३१ दि.०९/०४/२०११ अन्वये जाहिराती बाबत अवगत करणेकामी पत्र पाठविण्यात आले होते.

त्यास अनुसरुन मुंबई कार्यालयात ४ निविदा प्राप्त झालेल्या आहेत तर शिर्डी येथील कार्यालयात एकही निविदा प्राप्त झालेली नाही. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| Sr.No. | Name of Tenderer |
|---|---|
| 1 | M/s Ark Diagnostics Pvt. Ltd., Mumbai |
| 2 | M/s. Austin Health Care, Pune |
| 3 | M/s. Biosciences Medical Devices India Pvt. Ltd., Thane |
| 4 | M/s. Transasia Bio-Medicals Ltd., Mumbai |

तरी उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०४ तांत्रिक बाबींच्या सिलबंद निविदा आजचे सभेपुढे समक्ष उघडण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र. ३०० उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०४ तांत्रिक बाबींच्या सिलबंद निविदा आजच्या सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या. या निविदाबाबत तज्ञांचा सल्ला घेऊन, प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा,असें ठरलें.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२० गुंतवणूकीविषयी निर्णय घेणे बाबत.**

**निर्णय क्र. ३०१ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.२१ सोने व चांदी नाण्यांच्या विक्री किंमतीचे बदलाबाबत.**

**निर्णय क्र. ३०२ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.२२ संस्थानकडे उपलब्ध असलेले सोने-चांदी वस्तु वितळवुन नाणी, पेंडन्ट तयार करणे बाबत.**

**निर्णय क्र. ३०३ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.२३ श्री साईबाबा फाऊंडेशनचे नांवे असलेली गुंतवणूक संस्थानखाती वर्ग करणेबाबत.**

**निर्णय क्र. ३०४ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.२४ आयकर कायद्यातील तरतुदीन्वये दि.३१.०३.२०१० अखेर शिल्लक असलेल्या अखर्चीत उत्पन्नाच्या विनियोगाबाबत.**

**निर्णय क्र. ३०५ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.२५ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामधील मशिनरी/ इक्वीपमेंट दुरुस्ती व देखभाल करणेसाठी कन्झ्युमेबल स्पेअरपार्ट खरेदीबाबत.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये अंदाजे एकुण रु.३४,३०,४९,२८५/- इतक्या रकमेचे व श्री साईनाथ रुग्णालयात अंदाजे एकुण रु. १०,००,००,०००/- इतक्या रकमेचे मेडीकल इक्वीपमेंट, इन्स्ट्रुमेंट व मशीनरी सध्या वापरात आहे. सदरचे सर्व इक्वीपमेंट, इन्स्ट्रुमेंट व मशीनरी नियमीतपणे वापरात असुन सध्या त्या व्यवस्थित काम देत आहेत. वरीलपैकी श्री साईबाबा हॉस्पिटलच्या ११८ मशीन्सचे व श्री साईनाथ रुग्णालयातील ४६ मशीन्सचे मा.व्य. समीतीच्या दि.१८/०४/२०१० चे सभेतील निर्णयान्वये विविध कंपन्यांकडे वार्षीक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC/CMC) करण्यात आले आहे. ज्या मशिनरी / उपकरणे इ.ची वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC/CMC) करण्यात आलेली नाही त्या सर्व मशिनरी / उपकरणे इ. ऑपरेशन थिएटर, आय.सी.सी.यु., कॅज्युअल्टी, ओ.पी.डी., सर्जीकल्स वॉर्डस इ. विभागातील मशिनरी इन्स्ट्रुमेंटस ची दुरुस्ती व देखभाल रुग्णालयाचे बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागामार्फत केली जाते. परंतु जेंव्हा मशिनरी/ इक्वीपमेंट/इन्स्ट्रुमेंट खराब होते तेंव्हा त्यासाठी आवश्यक कन्झ्युमेबल स्पेअरपार्ट मार्केट मध्ये मिळत नाही. त्यामुळे सदरच्या दुरुस्तीसाठी जास्त वेळ लागतो व दैनंदीन कामकाज देखील बंद पडते. एक एक स्पेअर पार्ट घेतल्यामुळे बऱ्याच वेळा वाजवी किंमती पेक्षा जास्त रक्कमेने खरेदी करावे लागतात.

जर सोबतच्या यादीतील नेहमी लागणारे आवश्यक असे कन्झ्युमेबल स्पेअरपार्ट हॉस्पिटल मधील बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागात एक वर्षासाठी खरेदी करुन ठेवले तर मशिनरी/इन्स्ट्रुमेंट दुरुस्तीसाठी लागणारा विलंब कमी होईल. तसेच सदरचे स्पेअरपार्ट कोटेशन / निविदा मागवुन विहीत पध्दतीने खरेदी केल्यास वाजवी दरात उपलब्ध होतील.

त्यानूसार बायोमेडीकल विभागाने त्यांचे दि.०५/०२/२०११ चे पत्रान्वये सोबतच्या यादीप्रमाणे काही कन्झ्युमेबल स्पेअरपार्टची मागणी केलेली असून त्यामध्ये जनरल कन्झ्युमेबल स्पेअरपार्ट व मोनोपाली कन्झ युमेबल स्पेअरपार्ट असे दोन प्रकार दिलेले असून मोनोपाली कन्झ्युमेबल स्पेअरपार्ट हे ज्या कंपनीचे मशिन आहे त्याच कंपनीचे कन्झ्युमेबल स्पेअरपार्ट खरेदी करावे लागतात. परंतू त्यासाठी जर वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविल्यास कंपनी व त्यांचे अधिकृत विक्रेते यांचे स्पर्धात्मक दर प्राप्त होतील व ते वाजवी किंमतीत उपलब्ध होतील.

तेंव्हा जनरल कन्झ्युमेबल स्पेअरपार्ट तसेच काही मशिनसाठी ज्या कंपनीचे मशिन आहे त्याच कंपनीचे स्पेअर पार्टस् लागतात अशी कन्झ्युमेबल स्पेअरपार्ट विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३३,४९,८१४/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र. ३०६ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामधील मशिनरी/ इक्वीपमेंट दुरुस्ती व देखभाल करणेसाठी कन्झ्युमेबल स्पेअरपार्ट तसेच काही मशिनसाठी ज्या कंपनीचे मशिन आहे त्याच कंपनीचे स्पेअर पार्टस् लागतात अशी कन्झ्युमेबल स्पेअरपार्ट विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३३,४९,८१४/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२६ श्री साईबाबा रुग्णालयातील नविन कार्डीयाक ओ.टी. विभागासाठी पोर्टेबल क्ष - किरण (१०० MA) मशिन खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयात नविन कार्डीयाक ऑपरेशन थिएटर लवकरच कार्यान्वित करणेत येत आहे. सदर विभागासाठी लागणाऱ्या मशिनरी / उपकरणे इत्यादी खरेदीकामी मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०५/१२/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ९५४ अन्वये मशिनरी / उपकरणे कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागाचे मागणीप्रमाणे खरेदीकामी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत.

नविन कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागाने यापुर्वी मागणी केलेल्या मशिनरीमध्ये उपरोक्त पोर्टेबल क्ष-किरण मशिनची मागणी केलेली नव्हती. त्यामुळे त्यांनी दि. १८/०३/२०११ चे पत्रान्वये एक मशिनची मागणी केलेली आहे.

सदर मशिन हे अत्यवस्थ रुग्ण जे कॉटवरुन इतरत्र हलवता येऊ शकत नाही, त्यासाठी मशिन त्या जागेवर नेऊन क्ष-किरण काढता येतात. सदर मशिनची अंदाजे किंमत रु.१,५०,०००/- असून सदरची खरेदी ही विहित पध्दतीने कोटेशन मागवून करता येईल.

तरी सदर पोर्टेबल क्ष-किरण विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु.१,५०,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र. ३०७ श्री साईबाबा रुग्णालयातील नविन कार्डीयाक ओ.टी. विभागासाठी पोर्टेबल क्ष - किरण (१०० MA) मशिन विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु.१,५०,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२७ श्री साईनाथ रुग्णालयाकरीता Ultra Sonic Instrument Cleaner Machine खरेदीबाबत.**

**निर्णय क्र. ३०८ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.२८ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील वॉर्ड / विभागाकरीता लॉकर खरेदीबाबत.**
**निर्णय क्र. ३०९ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२९ श्री साईबाबा रुग्णालयाकरीता Harmonic Scalpet set देणगी स्वरुपात स्विकारणेबाबत.**
**निर्णय क्र. ३१० सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३० मुदतबाहय औषधे नष्ट करणेस व संगणकातून नोंदी निर्लिखीत करणेबाबत.**
**निर्णय क्र. ३११ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३१ स्टाफ नर्स भरतीप्रक्रियेकामी घेण्यात आलेल्या परिक्षेची गुणयादी उघडून त्यानुसार प्र-वर्गाप्रमाणे मुलाखतीकरिता बोलावयाचे उमेदवारांची संख्या, मुलाखतीची तारीख व वेळ निश्चित करणेबाबत.**
**निर्णय क्र. ३१२ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३२ श्री. प्रकाश दादा आरणे , श्री. संजय जगन्नाथ आरणे व इतर ०४, श्री. दामु लक्ष्मण साळवे, श्री. नितीन नाना जगधने व इतर ०५, श्री. सुरेश सखाराम डांगे व श्री. उत्तम सखाराम डांगे यांची जमिन खरेदी करणेबाबत.**
**निर्णय क्र. ३१३ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३३ साई कॉम्प्लेक्स मधील देणगी काऊंटर व बूक स्टॉल तसेच मंदिर परिसरातील दैनंदिन व दिनदर्शिका विक्री काऊंटरचे ठिकाणी ॲवेनिंग शेडची उभारणी करणे बाबत.**
**निर्णय क्र. ३१४ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३४ श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल करीता तात्पुरत्या स्वरुपाच्या वर्ग / खोल्यांचे बांधकामाबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २१ नोव्हेंबर, २०१० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ८७७ नुसार, संस्थान संचलित शैक्षणिक संकुलातील श्री साईबाबा इंग्लिश मिडियम स्कुल करीता, सध्या असलेल्या इमारतीलगत ( सर्व्हे नंबर १०७ पै व १०९ पै मध्ये ) तात्पुरत्या स्वरुपात वीट बांधकामात व छतासाठी कलर कोटेड टाटा ब्ल्यु स्कोप सीटस् वापरुन, पाच वर्ग खोल्यांचे बांधकाम करुन घेणेस व त्याकामी येणारे अंदाजित रक्कम रुपये १५,८६,६२१/- मात्रचे खर्चास तसेच याकामी विहीत पध्दतीने वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन स्पर्धात्मक निविदा मागविणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर निर्णयानुसार, विषयांकित कामासाठी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन, कोरे निविदा अर्जाची विक्री दिनांक ३० मार्च, २०११ ते दिनांक ०६ एप्रिल, २०११ अखेर करणेत आली. त्यानुसार ०५ (पाच) इच्छुक बांधकाम ठेकेदारांनी मुदतीत कोरे निविदा अर्ज विकत घेऊन, सिलबंद निविदा सादर करण्याच्या अंतिम दिनांक १४ एप्रिल, २०११ मुदतीअखेर, सदरचे ०५ (पाच) ही इच्छुक बांधकाम ठेकेदारांनी मुदतीत निविदा सादर केल्या होत्या.

**(ब)** उपरोक्त विषयांकित कामासाठी उपरोक्त प्राप्त झालेल्या निविदा उघडून त्यावर निर्णय घेणेकामी, येत्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावयाचा प्रस्तावाची प्रशासकीय टिपणी दिनांक १९ एप्रिल, २०११ रोजी मंजूर झालेली असून, ती मिटींग विभागाकडे यथायोग्य कार्यवाहीसाठी पाठविणेत आलेली होती.

तथापि, उपरोक्त विषयांस अनुसरुन, मा. अध्यक्षसाो. यांनी दूरध्वनी दिनांक ०४ मे, २०११ रोजी असे निर्देश दिले होते की, मा. व्यवस्थापन समितीची अथवा समितीचे मा. स्थानिक उपसमितीची सभा काही कारणास्तव येत्या काही दिवसांच्या कालावधीत होण्याची शक्यता नाही. विषयांकित काम हे शैक्षणिक संकुलासंबंधीत असल्याने तसेच सन २०११-१२ चे शैक्षणिक वर्ष लवकरच, म्हणजे माहे जून, २०११ मध्ये सुरु होत असल्याने, वाढीव वर्ग खोल्यांची आवश्यकता भासणार आहे. त्यामुळे सदरचे वर्गखोल्यांचे बांधकाम त्वरीत सुरु होणे अत्यंत गरजेचे आहे. तरी याकामी प्राप्त झालेल्या निविदा मा. कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी यांचेपुढे उघडून त्यावर यथोचित निर्णय घेऊन, खोल्या बांधकामास त्वरीत सुरुवात करावी. तसेच याबाबतचा कार्यअहवाल कार्योत्तर मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे येत्या सभेपुढे सादर करावा.

**(क)** वर नमुद केलेल्या विवेचनास अनुसरुन, मा.अध्यक्षसाो. यांचे निर्देशानुसार, दिनांक ०५ मे, २०११ रोजी मा. विश्वस्त श्री. सुरेशराव वाबळे पा. तसेच कार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, वरिष्ठ मुख्य अभियंता आदि, विषयांकित कामी प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा उघडून, त्याबाबत इच्छुक निविदासादरकर्त्यांशी चर्चा-वाटाघाटी करुन निर्णय घेणेकामी हजर होते. या उपस्थितांपुढे प्राप्त झालेल्या

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



पाचही सिलबंद निविदा उघडणेत येऊन त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत येऊन, संबंधित इच्छुक निविदाधारकांशी चर्चा तथा वाटाघाटी करणेत आल्या. त्याचा गोषवारा खालीलप्रमाणे

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव व गांव | आवक क्रमांक / दिनांक | निविदेतील दर | चर्चा - वाटाघाटी अंती दिलेले दर |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. अे. जी. जाधव, संगमनेर | १०५९/१४.०४.११ | २० टक्के जादा | १० टक्के जादा |
| ०२ | श्री. दिपक बी. कोटमे, कोपरगांव | १०५८/१४.०४.११ | ७ टक्के जादा | ०४ टक्के जादा |
| ०३ | श्री. पाचोरकर एम. एस., नाशिक | १०६०/१४.०४.११ | १५ टक्के जादा | गैरहजर |
| ०४ | श्री. एस.जी.गायकवाड कन्सट्रक्शन, राहाता | १०६१/१४.०४.११ | ७.५ टक्के जादा | ६.५ टक्के जादा |
| ०५ | इंजि. पाटील योगेश सुरेश, कोपरगांव | १०६२/१४.०४.११ | १० टक्के जादा | **०३ टक्के जादा** |

**(ड)** उपरोक्त तक्त्यात दर्शविलेप्रमाणे, विषयांकित काम करणेसाठी इंजि. पाटील योगेश सुरेश, कोपरगांव यांचे दर निम्नतम स्वरुपाचे असल्याने त्यांनी देऊ केलेले न्यूनतम दर ( निविदा रक्कमेच्या ०३ टक्के जादा रककम ) स्वीकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देणेत यावा अशी शिफारस उपस्थित सदस्यांनी केली. येत्या शैक्षणिक वर्षात म्हणजेच माहे जुन, २०११ मध्ये विषयांकित वर्ग खोल्यांची अत्यंत आवयश्यक असल्याने, सदरचे काम तातडीने पुर्ण करणेचे दृष्टीने त्वरीत कामास सुरुवात करावी असे ठेकेदार इंजि. पाटील योगेश सुरेश, कोपरगांव यांना समक्ष सुचना देणेत येऊन, सदर कामी त्यांना कार्यादेश देणेत आलेला आहे.

वर नमुद केलेप्रमाणे, विषयांकित काम न्यूनतम दरधारक इंजि. पाटील योगेश सुरेश, कोपरगांव यांचेकडून करुन घेणेत येत असून, याकामी करण्यात आलेल्या कार्यवाहीची यथोचित नोंद घेऊन, मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र. ३१५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल करीता तात्पुरत्या स्वरुपाच्या वर्ग / खोल्यांचे बांधकाम न्यूनतम दरधारक इंजि. पाटील योगेश सुरेश, कोपरगांव यांचेकडून करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३५ संस्थान प्रस्तावित विविध बांधकामाचा आढावा घेणे बाबत**

**निर्णय क्र. ३१६ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३६ शिर्डी येथील जलसंपदा विभागाची जागा संस्थानला हस्तांतरीत करुन त्याबदल्यात जलसंपदा विभागास मौजे निमगांव कोऱ्हाळे गट नं. ८७ (पै), ८८ (पै) मधील संस्थानचे जागेवर आवश्यकती बांधकामे करुन देणेकामी वास्तुविशारद नियुक्तीस व सदर बांधकामासाठी निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र. ३१७ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३७ श्री साईबाबा हॉस्पिटल मधील आर एम ओ होस्टेल इमारतीत अंतर्गत फेरबदल करुन रुग्णाकरीता वार्ड बनविणेबाबत.**

**निर्णय क्र. ३१८ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३८ कॅन्टीन विभागासाठी वॉकर टाईप स्टेनलेस स्टिल रेलिंग तयार करणे बाबत.**

**निर्णय क्र. ३१९ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.३९ श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथील नेटवर्क रुमकरीता ए.सी. खरेदी करणे बाबत.**

**निर्णय क्र. ३२० सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.४० स्टीम बॉयलरकरीता फोटोसेल व क्वाईल खरेदीस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र. ३२१ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक, प्रसादालय विभाग)

---

**विषय नं.४१ इंडियन ऑईल कॉर्पो.लि.यांचेकडील एल.पी.गॅस खरेदीकामी ॲडव्हान्स रक्कमेत वाढ करणेबाबत.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र. ३२२ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक, प्रसादालय विभाग)

---

**विषय नं.४२ पतंजली चिकित्सालय, हरिव्दार यांचेकडील उत्पादने खरेदी करणे बाबत.**
**निर्णय क्र. ३२३ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.४३ पोस्टेज स्टॉकमधून भेट देण्यात आलेली प्रकाशने किंमतीसह कमी करणेबाबत.**
**निर्णय क्र. ३२४ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.४४ सन २०१२ ची श्री साई दैनंदिनी (डायरी) व श्री साईबाबा दिनदर्शिका (कॅलेंडर) छपाई करुन विक्री करणेबाबत.**
**निर्णय क्र. ३२५ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.४५ मान्यवरांचे सत्कार करणेकामी खरेदी विभागामार्फत संस्थान प्रिंटेड शॉल खरेदी करणे बाबत.**
**निर्णय क्र. ३२६ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक, मंदिर विभाग)

---

**विषय नं.४६ विश्वचषक विजेत्या भारतीय क्रिकेट संघाला श्री साईबाबांचे सोन्याचे नाणे भेट देणेबाबत.**
**निर्णय क्र. ३२७ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

---

**विषय नं.४७ साईटेक प्रकल्पाअंतर्गत विकसीत करण्यात येणाऱ्या ऑनलाईन सर्व्हिसेससाठी घ्यावयाच्या धोरणात्मक निर्णयाबाबत.**
**निर्णय क्र. ३२८ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-आय.टी. विभागप्रमुख)

---

**विषय नं.४८ HP कंपनीस Brahm Device ला लाईव्ह दर्शन सिग्नल पुरविणेबाबत.**
**निर्णय क्र. ३२९ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-आय.टी. विभागप्रमुख)

---

**विषय नं.४९ श्री गुरुपौर्णिमा उत्सव - २०११ निमित्ताने समाधी मंदीर व मंदीर परिसरास फुलांची सजावट करणे बाबत.**
**निर्णय क्र. ३३० सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.५० नविन दोन ईनोव्हा वाहनांचे वाढीव दराबाबत.**
**निर्णय क्र. ३३१ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

---

**विषय नं.५१ अ) मासिक मानधन तत्वावर सेवेची मुदतवाढ मिळणेबाबत श्री एकनाथ नानासाहेब वाघ, माजी प्रशासकीय अधिकारी याचा दि. २७.०४.२०११ रोजीचा अर्ज.**
**ब) सेवानिवृतीनंतर मासिक मानधन तत्वावर सेवेची मुदतवाढ मिळणेबाबत श्री प्रभाकर भिकोबा बोरावके, प्रशासकीय अधिकारी यांचा दिनांक ७.०५.२०११ रोजीचा अर्ज**
**निर्णय क्र. ३३२ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना विभाग)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे सुचनेनुसार आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०१ किटकनाशक फवारणी (पेस्ट कंट्रोल) बाबत सिलबंद निवीदा समक्ष उघडणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.०१/०६/२०११ ते दि.३१/०५/२०१२ या एक वर्षाचे कालावधीसाठी,श्री साईबाबा संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती निवासस्थान या इमारतीमधील खोल्यामध्ये भक्तांना ढेकुण, झुरळे इत्यादी किटकाचा त्रास होवु नये म्हणुन किटकनाशक फवारणी ( पेस्ट कंट्रोल) करणेकामी इच्छुक,अनुभवी ठेकेदार/कंपनी यांचेकडुन सिलबंद निवीदा मागविण्यात आलेल्या आहेत. त्याकामी दि.२१/०४/२०११ रोजीचे महाराष्ट्र टाइम्स या दैनिकामधील निवीदा सुचनेबाबत जाहिरात प्रसिध्द केली होती. निवीदा विक्रीची मुदत दि.२१/०४/२०११ ते २७/०४/२०११ अखेर तसेच निवीदा स्विकारण्याची मुदत दि.०२/०५/२०११ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत होती.संस्थानचे शिर्डी व मुंबई कार्यालयातुन निवीदाची विक्री करुन ठेकेदारांनी भरुन दिलेल्या सिलबंद निवीदा दोहीही कार्यालयामध्ये स्विकारण्यात आलेल्या आहेत. त्या एकुण १३ सिलबंद निवीदा असुन त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| अं. नं. | निवीदा धारकाचे नाव व गाव |
|---|---|
| १ | मे.पेस्ट कंट्रोल एंटरप्रायजेस,अहमदाबाद, (गुजरात ) |
| २ | मे.नॉक डॉऊन पेस्ट कंट्रोल, बोरीवली (प) |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | |
|---|---|
| ३ | मे.एशिया पेस्ट कंट्रोल सर्व्हीस,मुंबई |
| ४ | मे.ॲा युनिक पेस्ट कंट्रोल प्रा.लि.मुंबई |
| ५ | मे.पॅरागॅान पेस्टीसाईड्स, मुंबई |
| ६ | मे.हिंदुस्थान इसेक्टीसाईडस,मुंबई |
| ७ | मे.जान्हवी पेस्ट कंट्रोल,डोंबीवली (पु) |
| ८ | मे.कल्पतरुस पेस्ट कंट्रोल,मुंबई |
| ९ | मे.पेस्ट कंट्रोंल एम वॉल्शे, मुंबई |
| १० | मे.यशोमंगल फर्निचर ॲण्ड पेस्ट कंट्रोल, पुणे |
| ११ | मे.दिपक पेस्ट कंट्रोल, लेबर सप्लायर्स ॲण्ड अदर सर्व्हिसेस, औरंगाबाद |
| १२ | मे.जी.टी.पेस्ट कंट्रोल कंपनी, पुणे |
| १३ | मे. श्री सचिन पेस्ट कंट्रोल,औरंगाबाद |

उपरोक्तप्रमाण प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन, निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| **अं. नं.** | **निवीदा धारकाचे नाव व गाव** | **निविदेतील दर प्रति चौ.फू.रुपये-पैसे** | **चर्चेअंती देऊ केलेले प्रति चौ.फू.रुपये-पैसे** |
|---|---|---|---|
| १ | मे.पेस्ट कंट्रोल एंटरप्रायजेस,अहमदाबाद, (गुजरात ) | २.८० | अनुपस्थित |
| २ | मे.नॉक डॉऊन पेस्ट कंट्रोल, बोरीवली (प) | ०.७० | अनुपस्थित |
| ३ | मे.एशिया पेस्ट कंट्रोल सर्व्हीस,मुंबई | ०.६० | ०.५७ |
| ४ | मे.ॲन युनिक पेस्ट कंट्रोल प्रा.लि.मुंबई | ०.७४ | अनुपस्थित |
| ५ | मे.पॅरागॅान पेस्टीसाईड्स, मुंबई | --- | अनुपस्थित |
| ६ | मे.हिंदुस्थान इसेक्टीसाईडस,मुंबई | ०.७८ | ०.७८ |
| ७ | मे.जान्हवी पेस्ट कंट्रोल,डोंबीवली (पु) | ०.६० + सर्व्हिस टॅक्स | अनुपस्थित |
| ८ | मे.कल्पतरुस पेस्ट कंट्रोल,मुंबई | भक्तनिवास २.८०<br>साईप्रसाद २.६०<br>द्वारावती २.४५ | अनुपस्थित |
| ९ | मे.पेस्ट कंट्रोंल एम वॉल्शे, मुंबई | २.४० | २.२० |
| १० | मे.यशोमंगल फर्निचर ॲण्ड पेस्ट कंट्रोल, पुणे | **०.९०** | **०.८०** |
| ११ | मे.दिपक पेस्ट कंट्रोल, लेबर सप्लायर्स ॲण्ड अदर सर्व्हिसेस, औरंगाबाद | १.२० | १.०० |
| १२ | मे.जी.टी.पेस्ट कंट्रोल कंपनी, पुणे | भक्तनिवास ०.९०<br>साईप्रसाद १.१५<br>द्वारावती ०.९० | ०.९० |
| १३ | मे. श्री सचिन पेस्ट कंट्रोल,औरंगाबाद | २.४० | २.३१ |

**निर्णय क्र.३३३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.यशोमंगल फर्निचर ॲण्ड पेस्ट कंट्रोल, पुणे हे कामासोबत फॉगींग ट्रिटमेंट मोफत पुरविणार असल्याने (मलेरिया मच्छर, डेंगू मच्छर, चिकनगुणिया मच्छर इत्यादीसाठी धुर मारणे) तसेच पूर्वी किटकनाशक फवारणी केल्यावर २४ तास रुम बंद ठेववी लागत होती. मे.यशोमंगल फर्निचर ॲण्ड पेस्ट कंट्रोल, पुणे यांनी ट्रिटमेंटने फवारणी केल्यानंतर केमिकलचा वास येत नसल्याने, रुम बंद करण्याची गरज नाही. व स्ट्रॉंग औषध मारल्यानंतर फक्त साडेतीन तास रुम बंद ठेवावी लागणार असल्याने पूढे लगेच ती रुम भक्तांचे वापरासाठी देणेकामी उपलब्ध होणार असल्याने संस्थानचा फायदा होणार आहे.**

**या सर्व बाबींचा विचार करुन मे.यशोमंगल फर्निचर ॲण्ड पेस्ट कंट्रोल, पुणे यांचे दर इतर निविदाधारकापेक्षा जास्त असले तरी ते स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, भक्तनिवास)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०२** **श्रींचे द्वारकामाई धुनीसाठी गोवरी खरेदीचे कोटेशन्स उघडुन दर निश्चित करणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७/०२/२०११ चे सभेतील विषय नं.१४, निर्णय क्र.१८९ अन्वये गोवरी पुरवठा धारकांकडून कोटेशन्स मागविणेत यावे असा निर्णय झाला आहे. त्यानुसार जा.नं.एसएसएस/ मंदिर/ ४३१ / २०११, दि.२०/०४/२०११ अन्वये गोवरी पुरवठा धारकांकडून राणशेणी व प्लॅस्टीक कागदावर थापील गोव-यांचे कोटेशन्स मागविण्यात आले आहे. त्यानुसार दि.०२/०५/२०११ अखेर प्राप्त झालेले कोटेशन्स खालीलप्रमाणे आहेत.

गोवरी पुरवठा धारकांची प्राप्त झालेले कोटेशन्स यादी-

| अ.क्र. | पुरवठा धारकाचे नाव | पत्ता |
|---|---|---|
| ०१ | श्री विजय पितांबर देवरे | मालेगाव (कॅम्प), जि.नाशिक |
| ०२ | श्री विजय पितांबर देवरे | रा.पो.पंचशील नगर, मालेगाव, जि.नाशिक |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | |
|---|---|---|
| ०३ | श्री संतोष मोतीराम सुर्यवंशी | मु.पो.लुल्ले, ता.मालेगाव, जि. नाशिक |
| ०४ | श्री वाल्मीक डिगा पवार | मु.पो.धुळे, जि. धुळे |
| ०५ | श्रीमती कुसुम लक्ष्मण ढवळे | मु.साकरवाडी, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता कोटेशन्ससादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.क्र. | पुरवठा धारकाचे नाव | कोटेशन्समधील दर प्रति किलो रुपये | |
|---|---|---|---|
| | | रानशेणी | थापील |
| ०१ | श्री विजय पितांबर देवरे<br>मालेगाव (कॅम्प), जि.नाशिक | ४.५० | ४.५० |
| ०२ | श्री विजय पितांबर देवरे<br>रा.पो.पंचशील नगर, मालेगाव, जि.नाशिक | -- | -- |
| ०३ | श्री संतोष मोतीराम सुर्यवंशी<br>मु.पो.लुल्ले, ता.मालेगाव, जि. नाशिक | ५.०० | -- |
| ०४ | श्री वाल्मीक डिगा पवार<br>मु.पो.धुळे, जि. धुळे | ६.०० | -- |
| ०५ | श्रीमती कुसुम लक्ष्मण ढवळे<br>मु.साकरवाडी, ता.कोपरगाव, जि.अहमदनगर | -- | ७.५० |

**निर्णय क्र.३३४ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री विजय पितांबर देवरे मालेगाव (कॅम्प), जि.नाशिक यांचे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,मंदिर विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३ दि.०१/०५/२०११ पासुन निवासस्थानच्या रु.१०००/- व त्यावरील रक्कमेस सेवाआकारावर लागु झालेला १०.३०% सर्व्हिस टॅक्स बाबत.**

**प्रस्ताव-** द्वारावती भक्तनिवास मध्ये एकुण ८० एसी रुम असुन त्यांचा सेवा आकार दर २४ तास व तीन व्यक्तीसाठी रु.१०००/- इतका आहे. जादा व्यक्ती असल्यास रु.५०/- प्रती बेड सेवाआकार घेऊन दोन व्यक्तीसह रु.११००/- सेवाआकार घेण्यात येतो.

नोटीफिकेशन नं. ३१/२०११ एसटी दि. २५/०४/२०११ मध्ये सर्व्हिस टॅक्स संबंधीत माहिती मध्ये रु. १०००/- व त्यावरील आकारास १०.३० % सर्व्हिस टॅक्स नमुद केला आहे. त्यावर ५० % सुट असुन तो ५.१५% सर्व्हिस टॅक्स दि. ०१/०५/२०११ पासुन लागु झालेला आहे.

संस्थानमध्ये रुम भाडे ऐवजी सेवाआकार ( Sanitation Charges ) असा शब्द प्रयोग भक्तांना देण्यात येणा-या पावतीवर केलेला आहे. सर्व्हिस टॅक्स भरावयाचा झाल्यास संस्थानसाठी सर्व्हिस टॅक्सचे रजिस्ट्रेशन करणे अनिवार्य होईल व त्यामुळे संस्थानच्या इतरही सर्व व्यवहारांवर सर्व्हिस टॅक्स भरावा लागेल.

द्वारावती भक्तनिवास विभागातील ८० एसी रुमचा सद्याला असलेला रु. १०००/- सेवाआकार व जादा बेड रु.५०/- यासह दरमहा रु. १० लाखा पेक्षा जादा सेवाआकार वसुल होतो. माहे मे- २०११ च्या १५ तारखे पर्यंत रु. ९,९७,५५०/- मुळ सेवाआकार व जादा बेडसाठी रु. ४२,८००/- असे एकुण रु.१०,४०,३५०/- इतका सेवाआकार प्राप्त झालेला आहे.

संस्थान पॅनल वरील कर सल्लागार श्री. अभय शास्त्री, पुणे यांच्या कडुन याबाबत लेखी सल्ला घेतला असता, त्यांनी मुळ भाडे (सेवाआकार) (डिक्लेअर टेरिफ) रु. १,०००/- ऐवजी रु.९००/- ( ३ व्यक्तींसाठी) करण्या बाबत कळविले आहे. त्यामुळे संस्थानला सर्व्हिस टॅक्स बाबत नोंदणी करावी लागणार नाही.

सदरचा सेवाआकार हा त्वरीत आमलात आणणे क्रम प्राप्त असल्यामुळे यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.३३५ यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती भक्तनिवास ए/सी रुमकरीता ३ व्यक्तींसाठी रुपये ९००/- सेवा आकार त्वरीत अमलात आणावा. तसेच जादा व्यक्ती असल्यास जादा बेड करीता रुपये ५०/- प्रती व्यक्ती घेण्यात येऊन तो Mattress Charges मध्ये दर्शविण्यात यावा असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक, व्दारावतील निवासस्थान)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०४ सन २०११-१२ सालामध्ये ज्यु.केजी या वर्गात विद्यार्थ्यांना प्रवेश देणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२७.०२.२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१५७ नुसार श्री साईबाबा इं.मि.स्कुलमध्ये ज्यु.केजी या वर्गातील विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रीया सुरु करुन दि.११.०४.२०११ ते

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



दि.२१.०४.२०११ कालावधीत ज्यु. केजीचे प्रवेशाचे फॉर्म विक्री करण्यात आलेले असून दि २२.०४.२०११ ते ३०.०४.२०११ दरम्यान भरुन आलेले फॉर्म स्विकारण्यात आलेले आहेत. याबाबत तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | मुदतीतील फॉर्म संख्या | मुदतीनंतरील फॉर्म संख्या | प्रवेश अर्ज देणेबाकी |
|---|---|---|---|---|
| ०१ | एकुण फॉर्म विक्री | ४४८ | १३ | ०० |
| ०२ | एकुण जमा फॉर्म | ४१० | १३ | ०० |
| ०३ | ३.३ ते ४.३ वयात बसलेले | २८० | १२ | ०० |
| ०४ | वयात न बसलेले | १३० | १ | ०० |
| ०५ | शिफारशीनुसार अर्ज मागणी | ०० | ०० | ११ |

उपरोक्त एकुण जमा ४१० प्रवेश अर्जापैंकी विधीत वयात बसलेले विद्यार्थीची विगतवारी खालीलप्रमाणे.

| अ.नं. | तपशिल | मुदतीतील फॉर्म संख्या | मुदतीनंतरील फॉर्म संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | संस्थान कर्मचारी | ७२ | ३ |
| ०२ | कंत्राटी कर्मचारी | १९ | २ |
| ०३ | शिरडी | १०६ | २ |
| ०४ | परिसर | ८३ | ५ |
| | एकुण | २८० | १२ |

मा. व्यवस्थापन समितीचे सभेत प्रस्तावित केल्याप्रमाणे वय वर्षे ३.३ ते ४.३ या वयोगटातील शिरडी व परिसरातील असे एकूण २९२ विद्यार्थी वयात बसतात. वयात बसलेले २९२ विद्यार्थ्यांना प्रवेश दयावयाचा असेल तर एका तुकडीत ५० विद्यार्थ्याप्रमाणे एकुण ६ वर्ग / तुकडया कराव्या लागणार आहे.

सध्या शाळेकडे ०१ वर्ग खोली व आय टी आय विभागाकडील ३ वर्ग खोल्या असे मिळून ०४ वर्ग खोल्या आहेत. तसेच शाळेकडील कार्यक्रमासाठी असलेले स्टेजमध्ये फोल्डींग प्लायवूडचे पार्टेशन टाकून ०२ वर्ग खोल्या भरविता येतील असे एकुण ०६ वर्ग खोल्या तयार करता येतील. बांधकाम विभागामार्फत शाळेचे मागील चिल्ड्रन पार्क मध्ये खोल्या बांधणीचे काम चालू आहे परंतू माहे १३ जुन पासून शाळा सुरु होत असल्याने तूर्त वर्ग / खोल्यांची अशी व्यवस्था करता येईल. परंतू फक्त जास्तीत जास्त ३०० विद्यार्थांनाच प्रवेश देण्यात यावा जेणेकरुन वरील परिस्थितीनुसार वर्ग / खोल्यांचे नियोजन करता येईल.

शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये ज्यु.केजी या वर्गाच्या ६ व सि.केजी या वर्गाच्या ६ अशा एकुण १२ वर्ग / तुकडया होतील. त्यासाठी एकूण १२ वर्ग शिक्षकांची गरज लागेल पैकी आपल्याकडे ४ कायम शिक्षीका असून मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने मुलाखतीने ५ शिक्षणसेंवक मानधन तत्वावर सन २००९-१० व २०१०-११ मध्ये घेणेत आलेले असून त्यांना २०११-१२ साठी पुनर नेमणूक देणेस मा. व्यवस्थापन समितीचे दि. २६.०३.२०११ रोजीचे सभेत निर्णय क्र. २३५ ने मान्यता मिळालेली आहे. तथापी जु.केजी च्या संभाव्य ६ वर्ग व सी. केजीच्या ६ अशा एकूण १२ तुकडयासाठी १२ शिक्षक आवश्यक आहेत. सध्या आपलेकडे ०९ शिक्षक उपलब्ध आहेत ज्यु.केजी च्या ०३ तुकडया झालेतर शिक्षण सेवकांची आवश्यकता भासणार नाही परंतू ०६ तुकडया झाल्या तर केजी विभागासाठी आणखी ०३ शिक्षण सेवकांची मानधन तत्वावर नेमणूक करणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन वॉक् इन इंटरव्हयू घेऊन ही पदे भरता येईल.

शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये इयत्ता १ ली ते इ. ४ थी प्राथमिक विभागाच्या एकुण १२ वर्ग / तुकडया होतील. त्यासाठी एकुण १२ वर्ग शिक्षकांची गरज लागेल पैकी आपल्याकडे ६ कायम शिक्षीका असून मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने मुलाखतीने ५ शिक्षणसेंवक मानधन तत्वावर सन २०१०-११ मध्ये घेणेत आलेले असून त्यांना २०११-१२ साठी पुनर नेमणूक देणेस मा. व्यवस्थापन समितीचे दि. २६.०३.२०११ रोजीचे सभेत निर्णय क्र. २३५ ने मागील वर्षाचे लेखी व तोंडी परिक्षेतील पात्र यादीतील उमेदवारास ०१ शिक्षणसेवक म्हणून नेमणूक देण्यात यावी अशी मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार हे शिक्षणसेवकाचे पद भरण्यात येणार आहे.

परंतू या शिक्षण सेवकांत असलेल्या श्रीमती आश्विनी राजाराम शिंदे या यांची सन २०११ -१२ या वर्षासाठी पुनर नेमणूक आदेश माहे १३ जुन पासून देण्यात येणार आहे. परंतू त्यांनी दि. ०५.०५.२०११ रोजीचे विनंती अर्जाने माहे १३ जुन ते १३ सप्टेंबर २०११ अखेर विनावेतन मॅटरनेटी लिव्ह मागणी केलेली आहे. परंतू त्यांचे या तीन महिन्याच्या रजेच्या कालावधीत कंत्राटी पध्द्तीने ०१ शिक्षण सेविका पद भरावे लागणार आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



तरी सन २०११-१२ मध्ये ज्यु केजीच्या किती विद्यार्थांना प्रवेश देणे व किती तुकडया ठेवाव्यात तसचे मानधन तत्वावर शिक्षणसेवक नेमणुककामी जाहिरात देणेबाबतचा विषय धोरणात्मक असल्याने मा. व्यवस्थापन समितीपुढे विचारार्थ सादर करावा लागेल. त्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र. ३३६ यावर सविस्तर चर्चा होऊन, वय वर्षे ३.३ ते ४.३ या वयोगटातील शिरडी व परिसरातील असे एकूण २९२ विद्यार्थ्यांना सन २०११-१२ सालामध्ये ज्यु.केजी या वर्गात विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा.तसेच काही जागा रिक्त राहिल्यास ४.३ वयोगटापूढील अर्जदाराचा विचार करावा. याकामी शिक्षण सेवक पदावर नेमणूक करणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात यावे असे ठरले.**

(कार्यवाही-प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०५ मा.विश्वस्तांचे सुचनेबाबत.**

**निर्णय क्र. ३३७** मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-

(०१) संस्थान कर्मचारी पुजा-अर्चा/ भजनसंध्या अशा कार्यक्रमांसाठी संस्थानची परवानगी न घेता बाहेर देशात-परदेशात जातात. अशा कार्यक्रमांसाठी संस्थान कर्मचाऱ्यांना जावयाचे असल्यास रितसर संस्थानची पुर्वपरवानगी घेण्यात यावी. त्यांनी रितसर पुर्वपरवानगी न घेतल्यास संबंधीतांवर कार्यवाही करण्यात यावी. (कार्यवाही- मंदिर विभाग प्रमुख)

(०२) मे. साईग्रेस फाऊन्डेशन.,मुंबई यांचे प्रतिनिधीनी श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर विषयी आजचे सभेत दि. २०.०५.२०११ पत्र समक्ष सादर केले. त्यावर खालीलप्रमाणे चर्चा झाली.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०७.०८.२०१० चे सभेतील निर्णय क्र.६७५अन्वये सन २०११ साठी मे. साईग्रेस फाऊन्डेशन.,मुंबई यांचेकडून श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर ३०,००० नग दर रु.२६१/-प्रमाणे तयार करुन घेणेचे ठरले होते. त्यानुसार मे.साईग्रेस फाऊन्डेशन,मुंबई यांना आदेश देणेत आला होता. आदेशीत श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर ३०,००० नग कॅलेंडर पैकी २५,४५८ नग तयार करुन घेणेत आले. त्याची दि.०१.११.२०१० पासून विक्री चालू करुन आज अखेर ८१२० नग कॅलेंडर शिल्लक आहेत. सदर कॅलेंडरचे सन २०११ चे डेटपॅड काढून फोटो फ्रेम तयार करुन घ्यावे. फोटो फ्रेम तयार करणेकामी जो खर्च होणार तो खर्च मे. साईग्रेस फाऊन्डेशन.,मुंबई हे सोसणार आहेत. त्यांना याकामाची कोणतीही रक्कम संस्थानकडून आदा करावयाची नाही. सदरचे सन २०११ चे कॅलेंडर (कलर व ब्लॅंक ॲण्ड व्हाईट ) कॅलेंडर खातेतून किंमतीसह कमी करुन श्री साईबाबा फोटो फ्रेम खाते वर्ग करावेत. सदरचे कॅलेंडर मे.साईग्रेस फाऊन्डेशन.,मुंबई यांचेकडे पाठविण्यात यावे. आदेशीत कॅलेडर दर रु. २६१/-मधून रु. ५१/- कमी करुन शिल्लक ८१२० नगांची रक्कम ते संस्थानला चेक ने परत करणार आहेत. सदरचे फोटो फ्रेम प्रती नग रु.२१०/- मध्ये पडेल.सदरचे श्री साईबाबा फोटो फ्रेम साईभक्तांना प्रती नग रु. २२०/- ने विक्री करणेत यावी, असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

वरील निर्णय क्र २८२ ते ३३७ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| (किशोर रा.मोरे) | (जयंत मुरलीधर ससाणे) |
| कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) | श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) |